# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### यावल (जि.जळगाव) येथे शहर व तालुका ग्रामीण भागात गावठी दारुची विक्री होत असल्याबाबत

**(१) ४२५१४ (१२-०४-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावल (जि.जळगाव) येथे शहर व तालुका ग्रामीण भागात प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे मानवी जीवनास अत्यंत धोकादायक गावठी दारुची खुलेआम विक्री होत असल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी गोरगरीब मजूर कामगार वर्गातील अल्पभूधारक शेतकरी अशा अनेकांचे संसार उद्धवस्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात गांर्भीयपूर्वक चौकशी करुन सदर अवैध गावठी दारुची विक्री थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.

यावल, जि.जळगाव येथे शहर व तालुका ग्रामीण भागात प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे दिनांक १९.०१.२०२२ वा त्यासुमारास मानवी जिवीतास अत्यंत धोकादायक दारु मिळून आल्यासंदर्भात कोणताही गुन्हा पोलीस स्टेशन यावल येथे दाखल नाही.

(३) अवैधरित्या गावठी दारुची विक्री करणाऱ्यांवर सातत्याने छापे टाकून कारवाई करण्यात येत आहे. याबाबतच्या सन २०२१ मध्ये ११३ केसेस करण्यात आल्या असून २१ आरोपींना अटक करण्यात आली आहे व ९२ आरोपींना सीआरपीसी ४१ (१) (अ) अन्वये नोटीस देण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून रु.२,९२,१८१/- इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सन २०२२ मध्ये एकूण ४८ केसेस करण्यात आल्या असून त्यामध्ये आरोपी अटक कारवाईसह रु.२,०६,३००/- इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मांजरा प्रकल्प (ता.कळंब, जि. उस्मानाबाद) येथील लासरा उच्चपातळी बराजमधील अतिरिक्त पाणी रायगव्हाण मध्यम प्रकल्पात वळवण्याबाबत

**(२) ४२६४२ (०१-०४-२०२२). श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) (ता. कळंब,जि. उस्मानाबाद) येथील मांजरा प्रकल्पाच्या खालील बाजूस असलेल्या लासरा उच्चपातळी बराजमधील अतिरिक्त पाणी रायगव्हाण मध्यम प्रकल्पामध्ये वळवण्याकरिता जलसंपदा विभागाने माहे जुलै २०२१ मध्ये वा त्या दरम्यान लासरा बराजच्या सर्वेक्षण व अन्वेषण अंदाजपत्रकाच्या कामास मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कमी पर्जमानामुळे रायगव्हाण परिसरातील नागरिकांना पिण्याचे पाणी व सिंचनास अडचणी निर्माण होत असल्याने मांजरा धरणाच्या खालील लासरा उच्चपातळी बराजमधील अतिरिक्त पाणी रायगव्हाण प्रकल्पाकडे वळवून सिंचन व शाश्वत प्रकल्पीय पाणीसाठा करता येऊ शकतो, यामुळे लातूर तालुक्यातील मुरुड व ५ गावे, शिराळा व (५) गावे येथील पाणी पुरवठा योजना पुनश्च कार्यान्वित करता येतील, तसेच गाधवड, माटेफळ व अन्य गावांनाही सिंचनाचा लाभ होईल, ही बाब लोकप्रतिनिधीने मा. जलसंपदा मंत्री यांना भेटून व लेखी पत्राद्वारे निदर्शनास आणून दिली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय निदर्शनास आले, तद्अनुषंगाने सदर लासरा ते रायगव्हाण या उपसासिंचन योजनेच्या अंदाजपत्रकास होत असलेल्या विलंबाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.

(३) शासन पत्र दि.१२.०७.२०२१ अन्वये उपसा मार्गाचे सर्वेक्षण कामास मंजुरी प्राप्त असून लासरा बॅरेज पासून रायगव्हाण मध्यम प्रकल्पापर्यंत सर्वेक्षणाचे काम पुर्ण करण्यात आलेले आहे. तदनंतर रायगव्हाण प्रकल्पात मांजरा धरणातून २०.६० कि.मी. लांबीच्या फिडर कालव्याव्दारे मांजरा प्रकल्पाच्या ओव्हरफ्लो च्या कालावधीत भरणा करण्याच्या योजनेचा समावेश करुन महामंडळ कार्यालयाने रु.६७.२६ कोटी रक्कमेस रायगव्हाण मध्यम प्रकल्पास तृतीय सुप्रमा प्रदान केली आहे. तथापि सद्य:स्थितीत लासरा बंधारा येथून उपसा सिंचन योजनेव्दारे प्रकल्पात पाणी सोडण्याच्या प्रस्तावामुळे रायगव्हाण मध्यम प्रकल्पाच्या मंजूर तृतीय सुप्रमा आराखडयात बदल होत असल्यामुळे उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने स्वतंत्र प्रशासकीय मान्यता प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश, कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मांजरा धरण व मांजरा नदी (ता.केज जि. बीड) वरील बॅरेजस करिता स्कॉडा प्रणाली विकसित करण्याबाबत

**(३) ४३०३६ (०१-०४-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांजरा धरण व मांजरा नदीवरील (ता.केज जि. बीड) सर्व बॅरेजस साठी Supervisory Control and Data Acquisition (SCADA) प्रणाली विकसित करण्याबाबतचा प्रस्ताव मुख्यअभियंता, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद. यांच्याकडे सादर करण्यात आलेला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक. यांच्या मार्फत मुल्यांकन करून घेऊन त्यानंतर नियामक मंडळाची मंजूरी घेऊन प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक २६/०९/२०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय निदर्शनास आले, तद्अनुषंगाने सदर प्रस्तावास मान्यता देऊन निधी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१२-२०२२) :** (१) होय,

मांजरा धरण व मांजरा नदीवरील (ता.केज जि.बीड) सर्व बॅरेजस साठी Supervisory Control and Data Acquisition (SCADA) प्रणाली विकसीत करण्याबाबतच्या कामाचा समावेश मांजरा प्रकल्पाच्या DRIP-II अंतर्गत

करण्यात आलेला असून, मांजरा प्रकल्पाचा सुधारित प्रकल्प छाननी अहवाल (PST-A व PST- B) प्रादेशिक कार्यालयाचे दि.०८/०३/२०२२ चे पत्रान्वये प्रकल्प संचालक, रा.प्र.स.क. (ड्रीप) तथा अधीक्षक अभियंता, धरण सुरक्षितता संघटना, नाशिक यांचे कार्यालयास सादर करण्यात आला आहे. सदर छाननी अहवालावर राज्य प्रकल्प संनियंत्रण (ड्रीप) कक्ष,नाशिक यांनी दि.११.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये शेरे उपस्थित केले आहेत.

स्वयंपुर्ण SCADA प्रणाली नाविन्यपुर्ण असल्याने त्याची व्यवहार्यता तपासणे व कार्यान्वयीत करण्यास होणारा विलंब लक्षात घेता स्वयंपुर्ण SCADA प्रणाली राबविणेकरीता आवश्यक अभ्यास करण्याच्या व अनुषंगिक अंदाजपत्रके सादर करण्याच्या सुचना प्राधिकरण कार्यालयाचे पत्र दि.२४/०५/२०२२ अन्वये संबंधीत यांत्रिकी / जलविद्युत विभागास देण्यात आलेल्या आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) राज्य प्रकल्प संनियंत्रण कक्ष (ड्रीप),नाशिक यांनी उपस्थित केलेल्या शे-यांची पूर्तता करुन सुधारीत छाननी अहवाल सादर करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.जागतिक बँकेची मान्यता प्राप्त करुन पुढील अनुषंगिक आवश्यक कार्यवाही करणे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धनेगाव (ता. केज, जि. बीड).मांजरा प्रकल्प येथे आद्यकवी श्री, मुकुंदराज स्वामी यांच्या नावाने उद्यानाच्या प्रस्तावास मंजूरी देणेबाबत**

**(४) ४३१०८ (०१-०४-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनेगाव (ता. केज, जि. बीड).मांजरा प्रकल्प येथे आद्यकवी श्री, मुकुंदराज स्वामी यांच्या नावाने उद्यानाचा प्रस्ताव आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उद्याना साठी जमीन ही संपादित करण्यात आली आहे, तसेच सदर धरणाचा परिसर हा केज, अंबाजोगाई, कळंब, तालुक्यातील लोकांसाठी मध्यभागी व जवळ असून हा परिसर निसर्गरम्य आहे. हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी केज, अंबाजोगाई, कळंब व इतर तालुक्यातील लोकांना, मुलांना, वृद्धाना, या ठिकाणी पर्यटनासाठी येता यावे असे पैठणच्या धर्तीवर या ठिकाणी उद्यान करणे बाबतच्या प्रस्तावाचा त्वरित आराखडा करण्याबाबत आदेश देऊन त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक २७/०९/२०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर प्रकरणी मंजूरी तसेच निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर उद्यानासाठी नव्याने जमीन संपादित करण्यात आलेली नाही. मांजरा जलाशयाकरीता संपादित जमीनीमध्ये उपलब्ध असलेल्या ३२ हे. क्षेत्रात सदर उद्यान विकसीत करणे प्रस्तावित आहे. सदर धरणाचा परिसर निसर्गरम्य असून केज,अंबाजोगाई,कळंब या तालुक्यांना जवळ आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) जिल्हाधिकारी, बीड यांच्या स्तरावरुन मांजरा प्रकल्प, धनेगाव, ता.केज, जि. बीड येथे संपादित केलेल्या ३२ हे. जमीनीवर जागतिक दर्जाचे जलपर्यटन विकासासाठी सर्वेक्षण आराखडा तयार करण्याचे निर्देश वरिष्ठ व्यवस्थापक(जलपर्यटन), महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई यांना देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील विले पार्ले विधानसभा क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या प्रलंबित समस्यांबाबत**

**(५) ४३२१६ (१८-०४-२०२२). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विलेपार्ले विधानसभा क्षेत्रातील बहुतांश झोपडपट्टी पुनर्वसन योजना विकासकाच्या गैरकारभारामुळे तसेच संबंधित विभागातील विविध समस्यांमुळे प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये टेक्निकल एरिया मरोळ पाईप लाईन, चकाला येथील सुखशांती, अंधेरी येथील पोद्दारवाडी, ओम शांती इत्यादि झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील भाडेतत्वावर गेलेल्या झोपडीधारकांना भाडे मिळणेही बंद झाले असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजना रखडल्या असल्यामुळे त्यातील रहिवाश्यांना संकटांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास केल्या गेलेल्या तक्रारीनंतरही विकासकावर योग्य कारवाई केली जात नाही हे खरे आहे काय,

(५) असल्यास, विलेपार्ले विधानसभा क्षेत्रातील प्रलंबित झोपडपट्टी पुनर्वसन योजना लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) ओम शांती या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील झोपडीधारकांना विकासकाने भाडे पूर्णपणे अदा केलेले आहे.

टेक्निकल एरिया मरोळ पाईप लाईन चकाला येथील सुखशांती, अंधेरी येथील पोद्दारवाडी या पुनर्वसन योजनेतील झोपडीधारकांचा भाडे मिळणेकामी अर्ज सहकार क्षेत्राकडे प्राप्त झालेला नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) सद्य:स्थितीत भाडे मिळणेकामी कोणताही अर्ज झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या सहकार कक्षाकडे प्राप्त झालेला नाही. विकासकाकडून भाडे थकीत झाल्यास विक्री घटकाचे काम थांबविण्यात येते.

(५) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे अशा रखडलेल्या झो.पु. योजनांना गती देण्याकरिता शासनाने धोरण निश्चित केले आहे.

---

**पंतप्रधान आवास योजनेच्या (शहरी )मंजूर प्रस्तावांना निधी मिळण्याबाबत.**

**(६) ४३३३६ (१८-०४-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान आवास योजनेच्या (शहरी) अंतर्गत सन २०२२ अखेरपर्यंत प्रत्येक कुटुंबाकडे सर्व सुविधांसह पक्के घर असावे या हेतूने राबविण्यात येणाऱ्या पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत शहरी भागातील प्रस्तावांना केंद्र व राज्य शासनाकडून मान्यता मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य व केंद्र शासनाकडून मंजूर प्रस्तावांना केंद्राकडून मिळणारे अनुदान प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, थकीत अनुदान मिळणेबाबत राज्य शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१२-२०२२) :** (१) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत राज्यात आत्तापर्यंत एकूण १५३० प्रकल्पांमधील एकूण १०,००,३२७ (९,०९,४४७ EWS) घरकूलांना राज्य स्तरीय मान्यता व संनियंत्रण समितीची (SLSMC) व केंद्र स्तरीय केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीची (CSMC) मान्यता प्राप्त आहे.

(२) व (३) केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीची मंजूरी प्राप्त झालेल्या घरकूलांना आत्तापर्यंत राज्य शासनाच्या हिश्श्यापोटी रूपये२६३२.३७ कोटी आणि केंद्र शासनाच्या हिश्श्यापोटी रूपये१८३९.६२ कोटी असा एकूण रूपये ४४७१.९९ कोटी इतका निधी अंमलबजावणी यंत्रणांना वितरीत करण्यात आला आहे. केंद्र हिश्श्याच्या निधीचे १००% उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास सादर केले असून उर्वरीत निधीबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अंबाजोगाई (जि.बीड) शहरात चोऱ्यांच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(७) ४३६१६ (०७-०४-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) शहरात पोलीस प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे चोऱ्यांचे व गुंडगिरीच्या प्रमाणात वाढ झाली असून दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास अंबाजोगाई येथील राठोड ज्वेलर्सचे मालक यांची भरदिवसा शिवाजी चौकातून स्कुटी चोरुन नेल्याचा प्रकार घडला व सदर स्कुटी मेवाड हॉटेलच्या पाठीमागे सोडून त्यातील १० लाख रुपयांचे दागिने चोरट्यांनी चोरुन नेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणात एक दिवस अगोदर संध्याकाळी चोरट्यांनी पाळत ठेऊन दुकानाच्या शटरच्या कुलपामध्ये फेव्हीकिव्ह व खडे टाकून सकाळी दुकान मालक श्री.राठोर यांनी कुलूप उघडत नसल्याने चावी बनवणाऱ्या कारागीराकडे शिवाजी चौकात गेले असता हा प्रकार घडला व सदर सर्व चोरीचा प्रकार सी.सी.टी.व्ही. मध्ये कैद झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणात चोरट्यांना पोलिसानी अटक केलेली आहे काय व त्यांच्याकडून किती मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) अंबाजोगाई, बीड येथे चोरीच्या घटनांमध्ये वाढ झालेली नाही.
दिनांक ०७.०२.२०२२ रोजी अज्ञात चोरट्यांनी फिर्यादीची दुचाकी व त्यामध्ये ठेवलेले रु.९,९३,२९३/- किमतीचे दागिने चोरुन नेल्याची घटना घडली असून चोरुन नेण्यात आलेली दुचाकी गावातील मेवाड हॉटेलच्या मागे सोडून देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) सीसीटीव्ही फुटेजमध्ये कुलुपामध्ये चिकट पदार्थ टाकल्याची व सदर चोरीची घटना कैद झालेली नाही.
(३) सदर प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.५४/२०२२, भा.दं.वि. कलम ३७९ अन्वये दिनांक ०७.०२.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

### चंद्रपूर शहरातील इरई नदीचे धोक्यात आलेले अस्तित्व रोखण्याबाबत

**(८) ४३८५३ (११-०४-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर शहरातील जीवनदायी म्हणून ओळख असलेल्या इरई नदीचे अस्तित्व धोक्यात आले असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर इरई नदीचे धोक्यात आलेले अस्तित्व रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयात समाजकल्याण विभागामार्फत सन २०२०-२१ मध्ये कोविड काळात काम केलेल्या कर्मचाऱ्यांची देयके मिळण्याबाबत.**

**(९) ४३८६६ (०९-०४-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात कोरोना काळात रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी समाजकल्याण विभागांतर्गत अे. टु-झेड या खाजगी एजन्सीला मनुष्यबळ पुरविण्याबाबतचे कंत्राट दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदाराची देयके समाजकल्याण विभागाकडून अदा करण्यात आलेले नसल्याचे , माहे जानेवारी,२०२२ त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे

(३) असल्यास, संबंधित कंत्राटदारांनी समाजकल्याण विभागाकडे थकीत देयके मिळण्याबाबत वारंवार मागणी करण्यात येऊनही सन २०२०-२०२१ मधील देयके अद्यापही प्रलंबित आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय तसेच देयके तात्काळ अदा करण्याच्या अनुषंगाने कोण्ती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-११-२०२२) :** (१) हे खरे आहे,

(२) व (३) हे खरे नाही

(४) व (५) लागु नाही.

---

**पंढरपुर तिर्थक्षेत्र विकास आराखडा अंतर्गत भिमा (चंद्रभागा) नदीवर विप्रदत्त ते उदव घाटाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(१०) ४३९०० (१२-०४-२०२२). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर तिर्थक्षेत्र विकास अंतर्गत चंद्रभागा नदीत आलेल्या घाटाची भिंत दिनांक १४/१०/२०२० रोजी पडली आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास पंढरपूर तिर्थक्षेत्र विकास अंतर्गत झालेले काम अं.अ भीमा कालवा मंडळ सोलापुर व का.अ.उजनी कालवा विभाग क्र.८ यांचे अंतर्गत झाले आहे काय,

(३) असल्यास, उक्त दुर्घटनेमध्ये सहा जणांना जीव गमवावा लागला, तसेच सदर दुर्घटनेला जबाबदार असणारे जयंत शिंदे अ.अ. व रमेश वाडकर का.अ. यांचेवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा का दाखल केला नाही,

(४) असल्यास, दुर्घटनेला जबाबदार असणारे जयंत शिंदे अ.अ.व रमेश वाडकर का.अ.यांचे निलंबल करुन सदोष मुनष्य वधाचा गुन्हा दाखल करुन चौकशी करणार काय ,

(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली असेल व चौकशी अहवाला मध्ये अतिवृष्टी कारण दाखवत असेल तर चंद्रभागा परिसरात विठ्ठल मंदिर सह कामे चुना बांधकामात झालेत ते का पडले याचा विचार अहवालात केला काय, तसेच इतर झालेली कामे अतिवृष्टी मुळे पडले नाही म्हणजे कोसळलेल्या भिंतीचे काम निकृष्ट झालेले आहे, हे खरे आहे काय ,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर दुर्घटनेमध्ये सहा जणांना जीव गमवावा लागला. तथापी, दि. १४.१०.२०२० रोजी पंढरपूर शहर व परीसरात १५७ मी. मी. पाऊस पडून अतिवृष्टी दरम्यान कुंभार घाटाजवळील बांधकामाधीन भिंत ढासळली. विभागीय आयुक्त, पुणे यांनी दि.२०/१०/२०२० च्या पत्रान्वये दुर्घटना स्थळाची संयुक्त पाहणी करुन अहवाल सादर करणेबाबत मुख्य अभियंता (वि.प्र),जलसंपदा विभाग, पुणे,श्री.भालचंद्र बिराजदार, प्राध्यापक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे व श्री.किरण कमलदानी, मे.किमया आर्किटेक्ट, पुणे यांना निर्देशित केले होते. त्यानुसार दि.२१/१०/२०२० रोजी दुर्घटना स्थळाची संयुक्त पाहणी करुन जलसंपदा विभागांतर्गत असणाऱ्या मुख्य अभियंता (वि.प्र.),जलसंपदा विभाग, पुणे यांनी त्यांचा अहवाल दि.२९/१०/२०२० रोजी विभागीय आयुक्त, पुणे यांना सादर केला आहे व त्याबाबत कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) दुर्घटनेचे कारणाबाबतचा निष्कर्ष नुसार उचित कार्यवाही विभागिय आयुक्त, पुणे यांचे कार्यालयामार्फत सुरू आहे.

(५) हे खरे नाही,

विभागीय आयुक्त,पुणे यांचे दि.२०/१०/२०२० चे पत्रान्वये दुर्घटना स्थळाच्या पाहणीचा तज्ञाकडून प्राप्त अहवालाच्या आधारे दुर्घटनेच्या कारणाबाबत निष्कर्षानुसार उचित कार्यवाही विभागीय आयुक्त, पुणे यांचे कार्यालयामार्फत सुरू आहे. सदरच्या घाट बांधकामामधील बांधकाम साहित्य यांचे चाचणी अहवाल जलसंपदा विभागाचे गुण नियंत्रण कक्ष, महाराष्ट्र अभियांत्रीकी संशोधन संस्था ( MERI ) नाशिक व शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय पुणे यांचेकडून चाचणी (Test) करून घेण्यात आलेले आहेत. तसेच संपुर्ण बांधकामाचे गुणनियंत्रण व तपासणी तिर्थक्षेत्र विकास आराखडा कार्यकारी समिती यांनी नेमणुक केलेली त्रयस्थ यंत्रणा यांचे मार्फत करण्यात आलेले आहे. सदर कामाचे Audit Report व Quality Control Report याचा अहवाल समाधानकारक आहे.

(६) सदर प्रकरणी दुर्घटनेचे कारणाबाबत निष्कर्षानुसार उचित कार्यवाही विभागीय आयुक्त, पुणे यांचे कार्यालयामार्फत सुरू आहे

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सुरगणा (जि.नाशिक) येथे बनावट नोटांचे रॅकेट कार्यरत असल्याबाबत

**(११) ४३९९३ (११-०४-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरगणा (जि.नाशिक) येथे सीमावर्ती भागात उंबरठाण येथे १०० व ५०० च्या बनावट नोटांचा वापर करणाऱ्यांचे रॅकेट असल्याचे दिनांक १५ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणात एकूण सात जणांना अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :** (१) सदर प्रकरणी सुरगणा पोलीस स्टेशन येथे दिनांक ०६.९.२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी दिनांक ०६.९.२०२१ रोजी सुरगाणा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.४३/२०२१, भा.दं.वि. कलम ४८९ (अ)(ब)(क), ३४ अन्वये एकूण ०७ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्ह्यातील सर्व आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दिनांक ०२.१२.२०२१ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## में निर्वाण टेक्स्टाईल, शिव ज्योति टेक्स्टाईल व एस.रामकुमार या कंपनीच्या मालकांनी आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(१२) ४४१०० (२४-०४-२०२२). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कपडा व्यवसायासाठी लागणारा कच्चा माल पुरवठा करणाऱ्या व्यावसायकाची आर्थिक फसवणूक करणाऱ्या में निर्वाण टेक्स्टाईल, शिव ज्योति टेक्स्टाईल व एस.रामकुमार या कंपनी मालकांवर कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य (शहरे) यांना दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(३) असल्यास, उक्त कंपनी मालकांवर कारवाई करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०२२) :** (१) सदर विषयाबाबतचे लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त नाही.

परंतु अर्जदार श्री. रिकेश शांतीलाल परमार यांनी दिनांक ०४/१२/२०२० रोजी पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २, भिवंडी यांचेकडे मे. निर्वाण टेक्सटाईल्स या कंपनीचे मालक श्री.माणिकचंद केसरवाणी व त्यांचा मुलगा श्री.रोहीत केसरवाणी, मे. शिवज्योती टेक्सटाईल्स, या कंपनीचे मालक श्री.मुलचंद केसरवाणी, मे. एस रामकुमार टेक्सटाईल्स या कंपनीचे मालक श्री.दिपचंद केसरवाणी या कंपनीचे मालक यांनी त्यांची फसवणुक केले बाबत तक्रारी अर्ज केला होता. सदर तक्रारी अर्जाचे चौकशीअंती आरोपीत यांचे विरूद्ध शांतीनगर पोलीस ठाणे गु.र.क्र. T३४५/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४०६, ३४ प्रमाणे दिनांक ०४/०६/२०२१ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

(२) सदर प्रकरणाच्या चौकशीत सदर गुन्हयाच्या तपासातील फिर्यादी श्री. रिकेश शांतीलाल परमार यांनी यातील मे. निर्वाण टेक्सटाईल्स या कंपनीचे मालक माणिकचंद पुरूषोत्तम केसरवाणी व त्यांचा मुलगा रोहीत माणिकचंद केसरवाणी मे. शिवज्योती टेक्सटाईल्स या कंपनीचे मालक मुलचंद पुरुषोत्तम केसरवाणी तसेच मे. एस रामकुमार टेक्सटाईल्स या कंपनीचे मालक दिपचंद पुरूषोत्तम केसरवाणी या कंपनीचे मालक यांना कच्चा कपडा तयार करण्याकरीता लागणारे यार्न विक्री केले असल्याचे निष्पन्न झाले आहे.

(३) सदर प्रकरणातील कपडा व्यवसायीक फिर्यादी श्री. रिकेश शांतीलाल परमार यांची आर्थीक फसवणुक करणाऱ्या सर्व आरोपींवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील आरोपीत नामे श्री.माणिकचंद केसरवाणी, श्री. रोहीत केसरवाणी, याचा मा. सेशन कोर्ट ठाणे यांनी अटकपूर्व जामीन अर्ज क्र. १९८६/२०२१ अन्वये दि.१८/०६/२०२१ रोजी जामीन मंजुर आहे.

श्री. मुलचंद केसरवाणी यांचा मा.सेशन कोर्ट ठाणे यांनी अटकपूर्व जामीन अर्ज क्र.१९७१/२०२१ अन्वये दि. १७/०६/२०२१ रोजी जामीन मंजुर आहे.

श्री. दिपचंद केसरवाणी यांचा मा.सेशन कोर्ट ठाणे यांनी अटकपूर्व जामीन अर्ज क्र.१९७२/२०२१ अन्वये दि. १७/०६/२०२१ रोजी जामीन मंजुर आहे.

परंतू सदर गुन्हयातील आरोपीत यांनी मा.सेशन कोर्ट, ठाणे यांचेकडील अटकपूर्व जामीन मंजुर आदेशाच्या अटी व शर्तीचे पालन न केल्याने त्यांचे विरूध्द मा. सेशन कोर्ट, ठाणे येथे त्यांचा अटकपूर्व जामीन नामंजुर होणेकरीता अपील करण्यात आले असुन सदर प्रकरण मा. न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. सदर प्रकरणी तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**ओझर (जि.नाशिक) येथे देवळाली मतदार संघाच्या लोकप्रतिनिधींचा पोलीस अधिकाऱ्यांनी अवमान केल्याबाबत**

**(१३) ४४१०३ (२४-०४-२०२२). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओझर (जि.नाशिक) येथे उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या स्वागतासाठी देवळाली मतदार संघाचे लोकप्रतिनिधी गेले असता त्यांना पोलीस अधिकारी व अप्पर पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांनी गाडी अडवून गाडीतून उतरवून अरेरावीची भाषा वापरुन लोकप्रतिनिधीचा अवमान केल्याची घटना दिनांक १ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर देवळाली मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक ६ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास तक्रार करुनही लोकप्रतिनिधींचा अवमान करणाऱ्या अप्पर पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार लोकप्रतिनिधींचा अवमान करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) :** (१) नाही

तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री यांचा दि.१.७.२०२१ रोजी नाशिक जिल्हा दौरा होता. सदर दौ-याच्या बंदोबस्ताचे देखरेख अधिकारी म्हणून अप्पर पोलीस अधीक्षक यांची नियुक्ती करण्यात आली होती.

व्हीआयपी दौ-याच्या वेळी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या गाड्या विमानतळाच्या विशिष्ट भागापर्यतच सोडल्या जावू शकतात. याबाबत Bureau of Civil Aviation Security चे परिपत्रक क्र.३६/५ अन्वयेच्या परिपत्रकात नमूद व्यक्तीखेरीज इतरांना विमानतळाच्या धावपट्टी परिसरात जाता येणार नाही, असे स्पष्ट नमूद आहे. त्यानुसार आमदाराना धावपट्टी परिसरात जाण्याची बंदी आहे.

देवळाली मतदार संघाचे लोकप्रतिनिधी हया आगमनावेळी उशीरा आल्या होत्या. त्यांची गाडी सरळ धावपट्टी कडे येत असताना नाशिक अपर पोलीस अधीक्षक यांनी थाबवून त्यांना उतरुन पुढे जाणेबाबत विनंती केली तेव्हा त्याच्यां गाडीतील एक व्यक्ती आमदार मॅडम आहेत, त्या कशा जातील असे म्हणाल्यावर, अपर पोलीस अधीक्षक यांनी त्यांना यापुढे गाडी नेता येणार नाही तुम्ही मॅडम यांना उतरून गाडी लाब अंतरावर थांबवा, असे सांगितले होते. सदर वेळी आगमनाची वेळ झाली होती त्यावेळी आमदार मॅडम या काहीच न म्हणता निघून गेल्या होत्या.

लोकप्रतिनिधींचा अवमान करण्याचा कोणताही हेतू कोणत्याच अधिका-याचा नव्हता. मा. आमदार यांना कोणीही उध्दटपणे बोलले नाही. अधिकारी यांनी सुरक्षेची नियमानुसार काळजी घेतली आहे.

(२) व (३) देवळाली मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांना दि.६.७.२०२१ रोजी विशेषाधिकार हक्क भंगाची सूचना दिली होती. सदर सूचना विभागास दि.२९.७.२०२१ रोजी प्राप्त झाली आहे. सदर प्रकरणी पुढील उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही

---

**मुंबई शहरातील गिरणी कामगारांना स्वत:च्या हक्काची घरे मिळण्याबाबत**

**(१४) ४४४७५ (१८-०४-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराच्या जडणघडणी व उभारणीमध्ये गिरणी कामगारांचे अमुल्य असे योगदान असून १ लाखाहून अधिक गिरणी कामगारांना अद्यापही मुंबईमध्ये स्वत:चे हक्काचे घर मिळालेले नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२२ वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गिरणी कामगारांना वेळेत व कालबद्ध पध्दतीने घरे (सदनिका) महाराष्ट्र गृहनिर्माण महामंडळ (म्हाडा) यांचेकडून केव्हापर्यंत उपलब्ध होणार आहेत,
(३) असल्यास, सध्या वाटपास तयार असलेल्या सदनिकांची गिरणीनिहाय संख्या किती असून गिरणी कामगारांना स्वत:ची हक्कांची घरे वेळेत देण्याबाबत राज्य शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) :** (१) ते (४) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील सुधारीत विनियम ५८ (१) (ब) नुसार मुंबईतील बंद / आजारी ५८ कापड गिरण्यांची मोकळी जागा व शिल्लक चटई क्षेत्र यांचे वाटप साधरणत: १/३ हिस्सा बृहन्मुंबई महानगरपालिका, म्हाडा व गिरणी मालक यांना प्रत्येकी देण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार म्हाडास ताबा प्राप्त झालेल्या गिरण्यांच्या जमिनीवर गिरणी कामगारांसाठी बांधण्यात आलेल्या १५८७० सदनिकांची लॉटरी पध्दतीने सोडत काढण्यात आली असून, ९३५३ सदनिकांचे वितरण करण्यात आले आहे व ६५३७ सदनिकांच्या वितरणाबाबतची कार्यवाही म्हाडाच्या स्तरावर सुरु आहे.
म्हाडाने गिरणी कामगारांच्या माहिती संकलना संदर्भात राबविलेल्या तीन मोहिमेमध्ये सुमारे १ लाख ७४ हजार गिरणी कामगार / त्यांच्या वारसांनी गिरणी कामगारांच्या घरांसाठी अर्ज केले आहेत .
गिरणी कामगार व त्यांच्या वारसांनी केलेल्या अर्जाची संख्या विचारात घेता, ठाणे जिल्ह्यातील ५ गावांतील जवळपास ११० एकर शासकीय जमिनीवर गिरणी कामगारांना / वारसांना म्हाडामार्फत घरे उपलब्ध करुन देण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे . उक्त गिरणी कामगार / वारसांना प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत घरे उपलब्ध करुन देता येईल किंवा कसे ही बाब ही शासन स्तरावर तपासण्यात येत आहे .

रेंटल हाऊसिंग योजनेतंर्गत एम.एम.आर.डी.ए. कडून म्हाडास प्राप्त होणाऱ्या २५२१ सदनिकांची सोडत काढण्याची कार्यवाही म्हाडाच्या स्तरावर सुरु आहे.

---

## मुंबईतील विविध कारणांमुळे प्रलंबित असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना मार्गी लावण्याकरिता अभय योजना सुरु करण्याबाबत

**(१५) ४४५६५ (२०-०९-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील विविध कारणांमुळे प्रलंबित असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना मार्गी लावण्यासाठी राज्य शासनाने अभय योजना आखली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेनुसार निधी उपलब्ध करणा-या वित्तीय संस्थांना रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविता येणार असून त्यासाठी झोपू प्राधिकरणाने वित्तीय संस्थांना ४५ दिवसांत (७ जून ते २१ जुलै, २०२२) स्वारस्य प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, किती वित्तीय संस्थांनी स्वारस्य प्रस्ताव सादर केले आहेत व पुढील कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(४ ) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०२३) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) एकूण ९ वित्तीय संस्थांनी स्वारस्य प्रस्ताव सादर केले आहेत. तसेच काही वित्तीय संस्थांनी विकासका ऐवजी लेन्डर (Lender) म्हणून सहभागी करुन घेण्याकरिता शासन निर्णयात सुधारणा करण्याची विनंती केली आहे. त्यानुसार दि.०९.१२.२०२२ रोजी सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य सरकारमध्ये कंत्राटी, हंगामी व नंतर सेवेत कायम झालेल्या शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन देण्याबाबत

**(१६) ४४५७४ (०६-१०-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, रिक्त पदे कंत्राटी पद्धतीने न भरता पूर्णवेळ भरण्यात यावी, अशा इतर बारा मागण्यांसाठी राज्य सरकारी कर्मचारी संघटनेने आंदोलन करणार असल्याचे जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाने व अन्य राजकीय पक्षांचे नेते यांनी याबाबत वेळोवेळी मागणी राज्य शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ पुर्वी कंत्राटी, हंगामी व नंतर सेवेत कायम झालेल्या शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन देण्यासंदर्भात राज्य शासनाने दिनांक १९ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास वित्त राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट स्थापन केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राजस्थान आणि छत्तीसगड या राज्यांनी शासकीय कर्मचाऱ्यांना लागू केलेल्या जुनी निवृत्ती वेतन योजनेच्या धर्तीवर राज्यात जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत अभ्यासगटामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करणे तसेच कंत्राटी, हंगामी कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन लागू करण्यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१२-२०२२) :**(१) व (२) होय हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) ही बाब अभ्यासगटाच्या कार्यकक्षेत नाही तसेच शासनाच्या विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) गृहप्रकल्पातील गिरणी कामगारांच्या घरांची सोडत प्रलंबित असल्याबाबत

**(१७) ४४६२२ (२०-०९-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) भाडेतत्वावरील गृहप्रकल्पातील गिरणी कामगारांसाठी २५२१ घरे मुंबई मंडळाला उपलब्ध करुन देण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गिरणी कामगारांच्या घरांची सोडत बऱ्याच महिन्यापासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गिरणी कामगारांच्या घराचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी घरांची सोडत प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे,
(२), (३) व (४) रेंटल हाऊसिंग योजने अंतर्गत एम.एम.आर.डी.ए. कडून म्हाडाकडे प्राप्त झालेल्या २,५२१ सदनिकांची सोडत काढण्याची कार्यवाही म्हाडामार्फत करण्यात येत आहे.

---

**वाडा (जि.पालघर) येथे पोलीसांकरिता निवासस्थान बांधण्याबाबतचा प्रलंबित असल्याबाबत**

**(१८) ४४६२७ (०६-१०-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा (जि.पालघर) येथे पोलीसांच्या निवासस्थानाचा प्रश्न गेल्या दहा वर्षांहून अधिक कालावधीपासून प्रलंबित असल्याने एकाही पोलीस कर्मचारी वर्गाला शासनाने निवासस्थान दिले नसल्याने येथील सर्व पोलीस महागड्या भाड्याच्या घरात रहात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठाण्यालगत मालकीची दोन एकरहून अधिक जागा असून सुमारे ६० वर्षांपूर्वी बांधलेल्या पोलीसांच्या निवासस्थानांची संपूर्णत: अडगळ झाली असून त्या जागेस जंगलाचे स्वरूप येऊन राहण्यासाठी एकही खोली सुस्थितीत नाही व त्या जागेचा उपयोग गुन्हे करतेवेळी पकडलेल्या गाड्या ठेवण्यासाठी केला जात असल्याने उंदीर, घुशी, साप, डुकरे तसेच मोकाट जनावरे कुत्री यांचा वावर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाकडून मिळणाऱ्या घरभाड्याच्या तिप्पट रक्कम खासगी निवासासाठी येथील ९५ पोलीस व ५ पोलीस अधिकारी यांना द्यावी लागत आहे तसेच सदर दोन एकरहून अधिक जागेवर विनाविलंब निवासस्थाने बांधण्याची नितांत गरज असतानाही मागील दहा वर्षांपासून पोलीसांच्या निवासस्थानाचा प्रश्न प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांना विनाविलंब पोलीस निवासस्थाने बांधण्याचे काम हाती घेऊन पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०२३) :** (१) पालघर पोलीस घटकातील वाडा पोलीस स्टेशन येथे नेमणुकीतील अधिकारी / अंमलदार यांचेसाठी १ अधिकारी ४५ अंमलदार अशी निवासस्थाने बांधण्यात आली आहेत. त्यापैकी ३ निवासस्थाने ही राहण्यास योग्य असुन त्यामध्ये पोलीस अंमलदार राहत आहेत. अधिकारी यांचेसाठी असलेले १ निवासस्थान व अंमलदारांसाठी असलेली ४२ निवासस्थाने ही नादुरूस्त असल्याने त्यामध्ये कोणीही राहत नाहीत. त्यामुळे पोलीस ठाणे नेमणुकीतील अधिकारी / अंमलदार हे खाजगी निवासस्थानामध्ये राहत आहेत.
(२) वाडा पोलीस ठाण्यालगत पोलीस स्टेशनच्या मालकीची जमीन असुन त्या जमीनीमध्ये कौलारू चाळीच्या खोल्या बांधण्यात आलेल्या होत्या. त्या नादुरूस्त झाल्याने सदर खोल्यांमध्ये कोणीही अधिकारी / अंमलदार राहत नाहीत.
(३), (४), (५) व (६) दि.०१ ऑगष्ट २०१४ रोजी ठाणे जिल्हा विभाजन होऊन पालघर जिल्हयाची निर्मिती करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक, पालघर कार्यालयाचे पत्र दि.१२/०७/२०१६ अन्वये नवीन बांधकामाचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे. परंतु त्यामध्ये त्रुटी असल्याने त्रुटीच्या पुर्तता पोलीस अधीक्षक, पालघर यांचे कडून करण्यात येत आहे. प्रस्ताव सादर झाल्यानंतर तो तपासून, त्यास प्राधान्यक्रम व निधीच्या उपलब्धतेच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**बीडीडी चाळ पुनर्विकास योजनेंतर्गत निवृत्त पोलिसांना मोफत घरे देण्याबाबत...**

**(१९) ४४६६३ (३१-१०-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीडीडी चाळ पुनर्विकास योजनेंतर्गत निवृत्त पोलिसांना मोफत घरे देण्याचे राज्य शासनाकडून सांगण्यात आले असून

एका घरासाठी ५० लाख रुपये शासनास विकास खर्च म्हणून द्यावे लागतील असे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मा.गृहनिर्माण मंत्री यांनी जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तुटपुंज्या सेवानिवृत्ती वेतनाच्या आधारावर ५० लाखांची रक्कम उभी करणे या सेवानिवृत्त पोलीसांना शक्य नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वरळीतील बीडीडी चाळीत अन्य शासकीय कर्मचाऱ्यांना ज्या पद्धतीने हक्काची निवासस्थाने दिली त्याच पद्धतीने पोलिसांनाही मोफत व हक्काची निवासस्थाने उपलब्ध करुन देण्याची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, पोलीसांना मोफत घरे देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केल्या आहेत काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१२-२०२२) :** (१) ते (५) बी. डी. डी. चाळींमध्ये दिनांक १ जानेवारी, २०११ रोजी पर्यत जे पोलीस कर्मचारी पोलीस सेवा निवासस्थानात वास्तव्यास आहेत ( सेवेत कार्यरत , सेवानिवृत्त व दिवंगत पोलीस कर्मचाऱ्यांचे कायदेशीर वारस इत्यादी) त्यांना बी. डी. डी.चाळींच्या पुनर्विकासातंर्गत बांधकाम खर्चाची रक्कम (Construction Cost) आकारून ५०० चौ . फूट क्षेत्रफळाच्या पुनर्विकसीत गाळयाचे वितरण मालकी तत्त्वावर करण्याचा निर्णय दिनांक १८ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे .

तत्कालिन मंत्री (गृहनिर्माण) यांनी मे - २०२२ मध्ये बी. डी. डी. चाळीमध्ये दिनांक १ जानेवारी, २०२१ रोजी पर्यंत वास्तव्यास असणाऱ्या आजी / माजी पोलीस कर्मचाऱ्यांना प्रति सदनिका रू .५० लक्ष बांधकाम खर्च आकारण्यात येईल असे समाज माध्यमांद्वारे ( ट्विटर ) घोषित केले होते .

उपरोक्त शासन निर्णय दिनांक १८ ऑगस्ट, २०२१ मध्ये नमूद पोलीस कर्मचारी/त्यांचे वारसदार यांना देण्यात येणाऱ्या कायमस्वरूपी पुनर्विकसीत गाळ्याकरीता रू.१५ लक्ष इतकी बांधकाम खर्चाची रक्कम आकारण्यात यावी, असा निर्णय या विभागाच्या दिनांक ३० ऑगस्ट, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

शासनाने बी.डी.डी. चाळीमध्ये कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यांना मालकी तत्वावर मोफत निवासस्थाने उपलब्ध करून दिलेली नाहीत.

---

**विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांचे पुनर्गठन करण्याबाबत**

**(२०) ४४६६५ (०६-१०-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांची मुदत दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी वा त्या सुमारास समाप्त झाली असून सदर तिन्ही विकास मंडळांचे पुनर्गठन करण्याबाबतचा प्रस्ताव अद्यापही शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मुदत संपून दोन वर्षांपेक्षा जास्त कालावधी उलटूनही सदर मंडळे पुनर्गठित न केल्याबाबतची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, राज्यातील विकासाचा अनुशेष दूर करण्यासाठी निर्माण करण्यात आलेली उपरोक्त तीन विकास मंडळे सत्वर पुनर्गठित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) :** (१) मा. मंत्रि मंडळाच्या दिनांक २७ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या बैठकीत विदर्भ विकास मंडळ, नागपूर, मराठवाडा विकास मंडळ, औरंगाबाद व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ, मुंबई ही तीनही वैधानिक विकास मंडळे पुनर्गठीत करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(२),(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे शहरातील कोर्ट नाका परिसरातील पोलिस वसाहतीमधील सर्व इमारती अतिधोकादायक झाल्याबाबत**

**(२१) ४४६७३ (०१-११-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील कोर्ट नाका व परिसरातील पोलिस वसाहतीमधील सर्व इमारती अतिधोकादायक झाल्याबाबतची सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाने ठाणे पोलीस आयुक्तांना दिनांक २८ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्र पाठवून केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त इमारती अतिधोकादायक झाल्याने तात्काळ खाली करण्याच्या सूचना पत्रात केल्या असून पावसाळ्यापूर्वी सदर इमारती खाली न केल्यास दुर्घटना घडण्याची शक्यता वर्तविण्यात आली असून असे घडल्यास विभाग जबाबदार नसेल असे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०१-२०२३) :**(१), (२) व (३) होय.

ठाणे पोलीस आयुक्तालय अंतर्गत कोर्ट नाका, ठाणे येथील नवीन पोलीस लाईन, चालक पोलीस लाईन, पी.आय क्वार्टस ८ व १६ व जरीमरी पोलीस लाईन इत्यादी २२ धोकादायक इमारतीमध्ये राहत असलेले ६१६ पोलीस अंमलदारांना स्थलांतरीत करणेसाठी निवासस्थाने उपलब्ध होणेकरीता मुख्य अधिकारी, कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वरळी, मुंबई, आयुक्त, मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण, बांद्रा, मुंबई, आयुक्त ठाणे, महानगरपालिका, व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांना पोलीस आयुक्त, ठाणे शहर कार्यालयाकडील दिनांक ०१/०४/२०२२ व २७/०५/२०२२ रोजी पत्र देण्यात आले आहे.

ठाणे शहर परिसरातील कोर्ट नाका येथील नवीन पोलीस लाईन व ड्रायव्हर पोलीस लाईन, जुने अधिकारी निवासस्थान येथील १० इमारतीचे संरचनात्मक परिक्षण साठी निधी सार्वजनिक बांधकाम विभागक्र. १ ठाणे यांना वर्ग करण्यात आलेला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग क. ०१ यांचेकडील दिनांक. ०६/०७/२०२२ अन्वये कोर्ट नाका येथील १० पोलीस इमारतीचे संरचानात्मक परिक्षण अहवाल प्राप्त झालेला आहे. यानुसार पी.आय.क्वार्टस् ८ ही एक इमारत (८ रूम) संपूर्ण धोकादायक घोषित केलेली आहे. सदर इमारती मध्ये कोणीही राहत नाही. व उर्वरित चालक पोलीस लाईन, इमारत क्र. १,३,४,५,६ व पी.आय. क्वार्टस १६, इत्यादी ९ इमारतीमधील एकुण ११६ रूम धोकादायक घोषित केलेल्या आहेत. सदर धोकादायक घोषित केलेल्या रुम मध्ये राहत असलेल्या पोलीस रहिवाशी यांना धोकादायक घोषित न केलेल्या व रिक्त असलेल्या इतर शासकीय निवासस्थांनामध्ये पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली आहे. धोकादायक घोषित केलेल्या रूममध्ये तात्काळ दुरूस्ती करणेबाबत व संरचनात्मक परिक्षण अहवालामध्ये नमुद केलेल्या उपाययोजना व दुरुस्तीबाबत पोलीस आयुक्त, ठाणे यांच्या कार्यालयाने दि. ०६/०३/२०२२ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे क्र.१, ठाणे यांच्याकडे पत्रव्यवहार करण्यात आलेला असून सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, ठाणे यांचेकडून नमुद इमारतीमधील निवासस्थानांची दुरुस्ती सुरू आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे यांचेकडील दिनांक २६/०८/२०२२ व दिनांक १५/०९/२०२२ अन्वये कोर्ट नाका / सिव्हील हॉस्पीटल येथील पोलीस वसाहतीमधील ११० रूमची दुरूस्ती केलेली आहे.

ठाणे शहर परिसरातील कोर्ट नाका येथील जरीमरी पोलीस वसाहत बिल्डींग ए.बी.सी.डी.ई.एफ. जी. एच. जे. के. एल व एन या १२ इमारतींचे संरचनात्मक परिक्षण केलेले आहे. सदर संरचनात्मक परिक्षण अहवालामध्ये एकही रूम धोकादायक घोषित केलेली नाही. परंतु सदर इमारतींची तात्काळ दुरूस्ती करणेबाबत कळविले आहे. पोलीस आयुक्त, ठाणे शहर कार्यालयाकडील दि.२१/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये संरचनात्मक अहवालामध्ये नमुद केलेल्या उपाययोजना व दुरुस्तीबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे क्र.०१ ठाणे यांना पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

ठाणे शहर परिसरातील कोर्ट नाका येथील नविन पोलीस टॉवर अरुण, सुर्य, रवि, भास्कर व आदित्य या निवासी इमारतींमध्ये प्रतिबंधक योजना व दुरुस्ती प्रगतीपथावर आहे.

ठाणे परिसरातील कोर्ट नाका ठाणे येथील जरीमरी पोलीस वसाहत इमारत क्रमांक ए.बी.सी.डी.ई.एफ. जी. एच. जे. के. एल व एन या १२ इमारतींचे दुरुस्ती व नुतनीकरण करणेकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कडील अंदाजपत्रकातील रक्कम रुपये १५,३४,८५,८१० इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता व निधी सत्वर उपलब्ध होवुन मिळणे करीता प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. ठाणे परिसरातील कोर्ट नाका ठाणे येथील नवीन पोलीस वसाहत बि.नं. १,३,४,५ व ६ या इमारतीमध्ये असलेल्या निवासस्थानांच्या मो-यांची पाणी गळती दुरूस्तीचे कामकाज करणेकरीता सदर इमारतीच्या दुरुस्तीबाबत सुधारित अंदाजपत्रक सादर करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक ०१, ठाणे यांना पत्रव्यवहार करणेत आलेला आहे.

ठाणे परिसरातील कोर्ट नाका ठाणे येथील नवीन पोलीस वसाहत बि.नं. १,३,४,५ व ६ या इमारतीमध्ये दुरुस्ती व नुतनीकरण करण्याकरीता सक्षम प्राधिका-याची तांत्रिक मान्यता व मुख्य अभियंता यांच्या शिफारशीसह सद्यस्थितीतील बाजारभावातील किंमतीनुसार सदर इमारतीच्या दुरुस्तीबाबत अंदाजपत्रक सादर करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक ०१ ठाणे यांना कळविले आहे.

ठाणे शहर परिसरातील कोर्ट नाका ठाणे येथील १२ बैठ्या चाळी पाडून त्या ठिकाणी नवीन ३१६ शासकीय निवासस्थाने बांधण्याबाबत पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी, मुंबई, यांनी मे. डीझाइन कंन्स्ट्रक्शन यांची वास्तुविशारद म्हणून नेमणूक केलेली आहे. निधी उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पोलीस कर्मचारी यांच्यासाठी विशेष कल्याणकारी महामंडळ स्थापन तसेच पोलीस कुटूंब आरोग्य योजनेमध्ये गंभीर आजारांचा समावेश करण्याबाबत**

**(२२) ४४६८८ (०६-१०-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस कर्मचारी व त्यांच्या परिवारातील सदस्यांसाठी विशेष कल्याणकारी महामंडळ स्थापन तसेच पोलीस कुटूंब आरोग्य योजनेमध्ये गंभीर आजारांचा समावेश करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालीन गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस दलातील कर्मचा-यांना त्यांच्या कामातील स्वरुपामुळे हृदयरोग व इतर गंभीर आजारावरील उपचारांसाठी कोणतीही विशेष व्यवस्था वा कल्याणकारी महामंडळ उपलब्ध नसल्यामुळे पोलीस कर्मचारी व त्यांच्या परिवाराला अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी भारतीय सैन्यातील कर्मचाऱ्यांसाठी स्थापन करण्यात आलेल्या महामंडळाप्रमाणे पोलीस कर्मचा-यांसाठी विशेष कल्याणकारी महामंडळ स्थापन केल्यास पोलीस कर्मचारी व कुटूंबियांना आरोग्य योजनेचा लाभ घेता येईल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील पोलीस कर्मचारी व त्यांच्या परिवारातील सदस्यांसाठी विशेष कल्याणकारी महामंडळ स्थापन तसेच पोलीस कुटूंब आरोग्य योजनेमध्ये गंभीर आजारांचा समावेश करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०१-२०२३) :**(१) व (२) महाराष्ट्र राज्य (वैद्यकीय देखभाल) अधिनियम, १९६१ च्या धर्तीवर महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना राबविण्यात येत आहे. सध्या, महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेतंर्गत एकूण ३९ आजारांवर उपचार अनुज्ञेय आहेत.

त्यापैकी शासन निर्णय दिनांक१९.०५.२००५ अन्वये २७ आकस्मिक व ०५ गंभीर आजार, शासन निर्णय दिनांक २७.०३.२०२२ अन्वये ०६ गंभीर आजार व उपचार आणि शासन निर्णय दिनाक १७.१२.२०२० अन्वये कोव्हीड-१९ या आजारांचा समावेश करण्यात आला आहे.

महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजने अंतर्गत ११ नवीन आजारांचा समावेश करण्याबाबत पोलीस महासंचालक यांनी प्रस्ताव सादर केला होता. यापैकी ७ आजारांचा समावेश दिनांक १९/०३/२००५ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आलेला असल्याने उर्वरित ४ आजारांचा समावेश करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(३) सध्या राज्यात पोलीस कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना राबविण्यात येत असल्यामुळे वेगवेगळे महामंडळ स्थापन करण्याबाबत तूर्त आवश्यकता नाही.

(४) व (५) वरील परिच्छेद १ प्रमाणे.

---

**श्री क्षेत्र जेजुरी गड तीर्थक्षेत्र मंदिर व गड जतन आणि संवर्धन आराखड्यास मंजूरी मिळण्याबाबत**

**(२३) ४४७२७ (०९-१०-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री क्षेत्र जेजुरी गड तीर्थक्षेत्र विकास आराखड्यानुसार पहिल्या टप्प्यात जेजुरी मंदिर व गड जतन आणि संवर्धन तसेच परिसर व जल व्यवस्थापनाचे काम करण्यास शासनाने मंजूरी दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पहिल्या टप्प्यातील कामे किती कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे व याकरीता किती निधीची तरतूद केली आहे,

(३) असल्यास, उर्वरीत कामे करण्यासाठीचा दुस-या व तिस-या टप्प्यातील आराखडे तयार करण्यात आले आहेत काय, त्याचे स्वरुप काय आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०१-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) श्री क्षेत्र जेजुरी गड तीर्थक्षेत्र विकास आराखडया मधील पहिल्या टप्प्यातील कामे दि.३१.३.२०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. याकरिता सन २०२२-२३ मध्ये रु.५०.०० कोटी इतका नियतव्यय राखून ठेवला आहे.

(३) दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यातील आराखडे तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**झोपडपट्टी पुनर्विकास योजनेत अडीच लाख रुपये शुल्क आकारुन झोपडपट्टीवासीयांना घरे देण्याबाबत**

**(२४) ४४७३० (२०-०९-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्विकास योजनेत अडीच लाख रुपये शुल्क आकारुन झोपडपट्टीवासीयांना घरे देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत कोणत्या कालावधीपासून ते कोणत्या कालावधीपर्यंतच्या झोपड्या पुनर्विकासासाठी पात्र ठरविण्यात येणार आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रलंबित झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पांना चालना देण्यासाठी शासनातर्फे कोणकोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.

तथापि, या विषयासंदर्भात अभ्यास करुन शासनास शिफारस करण्यासाठी मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे.

(२) दि.१६.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार दि.०१.०१.२००० नंतर परंतु दि.०१.१.२०११ रोजी अथवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या सशुल्क पुनर्वसनासाठी पात्र झोपडीधारकांना याचा लाभ देता येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शालेय शिक्षणाच्या सर्वांगीण विकासाकरिता नियोजन विभागाकडून जिल्हा नियोजन समितीस उपलब्ध होणाऱ्या जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीतून किमान ५ टक्के निधी शाळांसाठी राखून ठेवण्याबाबत**

**(२५) ४४७८० (०७-१०-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शालेय शिक्षणाच्या सर्वांगीण विकासाकरिता नियोजन विभागाकडून जिल्हा नियोजन समितीस उपलब्ध होणाऱ्या जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीतून किमान ५ टक्के निधी शाळांसाठी राखून ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निर्णयाची अंमलबजावणी केव्हापर्यंत करण्यात येईल वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :** (१) हे खरे आहे
(२) सदरहू निर्णयाची अंमलबजावणी आर्थिक वर्ष २०२३-२४ पासून करण्यात येणार आहे
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**औंध (जि.सातारा) येथील पोलीस कोठडी तोडून पाच दरोडेखोर फरार झाल्याबाबत**

**(२६) ४४९१३ (०६-१०-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औंध (जि.सातारा) येथील पोलीस ठाण्यामधील कोठडी तोडून पाच कुख्यात दरोडेखोर फरार झाल्याची घटना दिनांक ९ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त फरार दरोडेखोरांपैकी दोघांना पकडण्यात औंध पोलिसांना यश आले, परंतु उर्वरित दरोडेखोर अद्याप पोलीसांना सापडलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाचा तपास करण्यात आला आहे काय, तपासानुसार त्यात काय आढळून आले व त्यानुसार पोलीसांनी फरार दरोडेखोरांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) दिनांक ९ मे, २०२२ रोजी फरार एकूण पाच आरोपींपैकी चार आरोपींना अटक करण्यात आली असून एका आरोपीचा शोध घेण्यात येत आहे.
(३) व (४) आरोपींनी लॉकअपचा दरवाजा तोडून पळून गेल्याने त्यांच्याविरुध्द भा.द.वि कलम २२४, ३५३, ३३२, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच, आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

तसेच सदर प्रकरणी कर्तव्यात कसूर केल्याने एक पोलीस अधिकारी व चार अमलदार यांच्याविरूध्द तीन वर्षाकरीता वेतनवाढ स्थगित करण्याबाबतची शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे.
(५) विलंब झालेला नाही.

---

### काजिर्डा (ता.राजापूर, जि. रत्नागिरी) येथील जामदा प्रकल्पाचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(२७) ४४९५७ (१२-१०-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काजिर्डा (ता. राजापूर, जि. रत्नागिरी) येथील जामदा प्रकल्पाचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याने गैरकारभाराची चौकशी करावी अशी मागणी श्री.सुरेश गुडेकर, तळवडे (ता.राजापूर, जि. रत्नागिरी) यांनी दिनांक २२ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा. जलसंपदा मंत्री, जिल्हाधिकारी, प्रांतधिकारी, तहसिलदार तसेच पोलीस निरीक्षक, राजापूर यांच्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त ठेकेदाराच्या गैरकारभाराबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०१-२०२३) :** (१) अंशतः खरे आहे. जामदा प्रकल्पाचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याने गैरकारभाराची चौकशी करणेबाबतचे श्री. सुरेश गुडेकर तळवडे (ता.राजापूर जि.रत्नागिरी) यांचे निवेदन फक्त उपविभागीय अधिकारी (प्रांत), राजापूर यांना प्राप्त आहे.
(२) सदर निवेदनाचे अनुषंगाने श्री. सुरेश गुडेकर यांचेकडे पत्र व्यवहार केल्यानंतर सदरहू निवेदन / पत्र आपले नसल्याचे श्री.सुरेश गुडेकर यांनी कळविले आहे. सबब चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महावितरणाच्या तांत्रिक बिघाडांमुळे माहे डिसेंबर २०२१ दरम्यान राज्यात अनेक ठिकाणी वीज खंडित झाल्याबाबत

**(२८) ४४९६६ (२०-०९-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरणाच्या तांत्रिक बिघाडांमुळे माहे डिसेंबर, २०२१ दरम्यान राज्यात वीज खंडित होण्याच्या १४ हजार ९३७ घटना घडल्या असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज खंडीत झाल्यामुळे सुमारे पावणेतीन कोटी ग्राहकांना एकूण ५२ हजार ५०८ तास अंधारात बसावे लागले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच महावितरण विभाग वीज नियामक आयोगाच्या दर महा विश्वासार्हतेचे निर्देशांक प्रसिद्ध करण्याचे आदेशाचे उल्लंघन करत असल्याचे ही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
प्रति ग्राहक सरासरी व्यत्ययाचा कालावधी निर्देशांक (CAIDI) डिसेंबर २०२१ या महिन्यामध्ये १४७ मिनीट असा आहे.
(३) हे खरे नाही.

मा.वीज नियामक आयोगाच्या आदेशाप्रमाणे विश्वासार्हतेचे निर्देशांक (SAIDI, SAIFI, CAIDI) महावितरणच्या वेबसाईटवर प्रकाशित करण्यात येते.
(४) वादळी वारे व पाऊस या नैसर्गिक आपत्ती तसेच इतर तांत्रिक कारणास्तव (वाहिन्या व रोहित्रावरील बिघाड, आपत्कालीन आऊटेजेस) वीज वाहिनीवर बिघाड झाल्यानंतर तात्काळ पाहणी करुन व योग्य ती दुरुस्ती करुन कमीत कमी वेळेत वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे. तसेच वीज वाहिन्यांची नियमितपणे प्रतिबंधात्मक देखभाल व दुरुस्ती करुन वीज पुरवठा कमीत कमी खंडित होईल याची खबरदारी घेण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुलुंड (मुंबइ पूर्व) येथील छत्रपती संभाजी राजे मैदान दारुड्यांचा आणि समाजकंटकांचा अड्डा बनल्याबाबत**

**(२९) ४५०३७ (०६-१०-२०२२). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुलुंड (मुंबइ पूर्व) येथील छत्रपती संभाजी राजे मैदानात सध्या दारुडे आणि समाजकंटकांचा वावर असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त परिसरातील हजारो खेळाडू आणि नागरिक दररोज या मैदानात सरावासाठी आणि विरंगुळाकरिता येतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मैदानाच्या कानाकोपऱ्यात नशेखोर, दारुडे आणि समाजकंटक नशापान करीत असल्याने येथील नागरिकांना असुरक्षित वाटत असून त्यांनी पालिका प्रशासन, पोलिस यांच्याकडे तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, सदर मैदानात सकाळी व संध्याकाळच्या वेळी काही प्रमाणात नागरीक फिरायला येत असतात.
(३) व (४) सदर मैदानाच्या कोपऱ्यात काही इसम नशापान करताना आढळल्याने नागरिकांनी पोलीस नियंत्रण कक्ष येथील १०० नंबर वर केलेल्या तक्रारीस अनुसरून मैदानात सार्वजनिक ठिकाणी दारु पित असल्याचे आढळून आलेल्या इसमास पोलीस ठाणेस आणून त्याच्यावर म.पो.का कलम ११०/११७ अन्वये रु. १२००/- इतक्या दंडाची शिक्षा केली आहे.
सदर परिसरात व पोलीस ठाणे हद्दीत मोबाईल, मार्शल, गणवेषातील अधिकारी / अंमलदार तसेच साध्या वेषातील अधिकारी व अंमलदार यांची सतत गस्त ठेवण्यात आलेली आहे. गस्ती दरम्यान अशाप्रकारे नशापान करणारे इसम आढळून आल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करणेबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर मैदानाची देखभाल करणेकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सुरक्षा रक्षक नेमण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यस्तरीय राज्य पोलीस तक्रार निवारण न्यायाधिकरणात गेल्या दोन वर्षापासून सदस्यांची व कर्मचा-यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३०) ४५०९० (०७-१०-२०२२). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पोलीसांकडून होणारी छळवणूक व आत्महत्याविरोधात दाद मागण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायलयाच्या

आदेशाप्रमाणे शासनाने पाच वर्षापूर्वी मुंबईत स्थापन केलेल्या राज्यस्तरीय महाराष्ट्र पोलीस तक्रार निवारण न्यायाधिकरण कार्यालयात अध्यक्षांसोबत सुनावणीचे कामकाज करणाऱ्या सदस्यांची पदे व कर्मचाऱ्यांची अनेक नियमित पदे गेले अनेक वर्षापासून रिक्त असल्याचा प्रकार दिनांक ३ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी व तीन आठवड्यात पदे भरण्याबाबतचा अहवाल सादर करावा असे निर्देश मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ०४ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने काय कार्यवाही शासनाने करुन याबाबतचा अहवाल मा.मुंबई उच्च न्यायालयास सादर केला आहे काय तसेच गेले पाच वर्षापासून ते अद्यापपर्यंत न्यायाधिकरणात पोलीसांविरुद्ध दाखल तक्रारींची एकूण संख्या किती आहे व अद्यापपर्यंत एकूण किती तक्रारीवर कार्यवाही पूर्ण झाली व बाकी आहेत,

(४) असल्यास, यासंदर्भात सामान्य जनतेस पोलिसांकडून न्याय मिळावा यादृष्टीने न्यायाधिकरणातील रिक्त पदे भरुन कामकाज सुरळीत चालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०१-२०२३) :** (१) राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाचे कामकाज दिनांक ०२/०१/२०१७ पासून नियमितरित्या सुरु झाले असून प्राधिकरणाच्या तत्कालीन समितीवर अध्यक्ष, सदस्य (पोलीस सेवेतील निवृत्त अधिकारी), सदस्य ( सचिव दर्जाचे निवृत्त अधिकारी) व सदस्य (नागरी समाजातील मान्यवर व्यक्ती) ही सर्व पदे भरण्यात आली होती तथापि, दिनांक ०१/१०/२०१९ पासून तत्कालीन अध्यक्ष यांनी वैद्यकीय कारणास्तव राजीनामा दिल्यामुळे तसेच दिनांक ३१/०८/२०१७ पासून सदस्य (सचिव दर्जा) यांनी राजीनामा दिल्यामुळे ती पदे रिक्त झाली होती. समितीचा ३ वर्षाचा कालावधी दि.०१/०१/२०२० रोजी संपुष्टात आल्यानंतर अध्यक्ष पदावर न्यायिक सेवेतील सेवानिवृत्त न्यायमुर्ती यांनी दिनांक १७/०३/२०२० पासून अध्यक्ष पदाचा कार्यभार स्विकारला तर सदस्य ( समाज मान्यवर व्यक्ती ) यांची दिनांक १४/०७/२०२० पासून नियुक्ती करण्यात आली . तथापि सदस्य ( समाज मान्यवर व्यक्ती ) हे नियुक्तीसाठी अपात्र असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांची नियुक्ती दिनांक ०५/०७/२०२१ रोजी रद्द करण्यात आली . त्यानंतर हे पद दिनांक ३०/०९/२०२२ पासून भरण्यात आले आहे व इतर सदस्यांच्या नियुक्तीचे प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहेत .

(२) होय.

(३) दिनांक ०४/०४/२०२२ रोजी मा.उच्च न्यायालयाने पद भरतीबाबत केलेल्या अथवा करण्यात येणाऱ्या कार्यवाहीबाबत शासनाकडून माहिती घेण्याच्या सूचना सरकारी वकिलांना दिल्या आहेत.

जनहित याचिका क्र.६५६८/२०२२ या प्रकरणात सरकारी वकिलांना दिलेल्या माहितीनुसार सन २०१७-२०२२ या कालावधीत प्राधिकरणामध्ये पोलीसांविरूध्द प्राप्त तक्रारींची संख्या ३६३४ एवढी असून छाननीअंती १८८१ तक्रारी निकाली काढल्या आहेत व सुनावणी अंती १५६३ तक्रारी निकाली काढलेल्या आहेत . यानुसार तक्रारींच्या निपटा-याची टक्केवारी ९० टक्क्यांपेक्षा अधिक आहे व ९० तक्रारींची सुनावणी सुरु आहे .

(४)प्राधिकरणाच्या समितीवरील सदस्यांची रिक्त पदे तसेच कार्यालयातील नियमित रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरू असून सन २०१७ ते २०२२ या कालावधीतील कामकाजाची टक्केवारी पाहता सामान्य जनतेस प्राधिकरणाकडून योग्य व जलद पध्दतीने न्याय दिला जात आहे असे दिसून येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दोंडाई (जि.धुळे) येथील शहरात वाढलेल्या चोरीच्या घटनांबाबत

**(३१) ४५१०३ (०६-१०-२०२२). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोंडाई (जि.धुळे) येथील शहरात गेल्या वर्षभरापासून मोठ्या प्रमाणावर चोऱ्या, दरोडे, लुटमार करणे अशा घटना दररोज घडत असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहरात चोऱ्या, दरोडे, लुटमार आदी घटनांपैकी केवळ ५ टक्के चोरांचा तपास लावण्यात पोलिस प्रशासन यशस्वी झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त घटनांना आळा घालून कायदा व सुव्यवस्था राखण्याकरिता कोणत्या उपाययोजना व कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :**(१) व (२) दोंडाई शहरात सन २०२१ मध्ये दरोडा, घरफोडी, व चोरीच्या एकुण ७५ घटना घडल्या असून सन २०२२ मध्ये दिनांक ३० जून पर्यंत दरोडा, घरफोडी व चोरी च्या ४९ घटना घडल्या आहेत. सन २०२१ मध्ये दरोडा, घरफोडी व चोरीच्या एकूण दाखल गुन्ह्यापैकी २८ टक्के व सन २०२२ मध्ये ३७ टक्के गुन्हे पोलीस प्रशासनाकडून उघडकीस आण्ण्यात आले आहेत.
(३) सदर गुन्हे रोखण्यासाठी दोंडाई पोलीसांकडून खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे.
(अ) दोंडाईचा पोलीस स्टेशनकडून शहराची विभागणी ४ सेक्टरमध्ये करण्यात आली असून प्रत्येक सेक्टरसाठी किमान २ पोलीस अंमलदार गस्तीसाठी नेमण्यात आले आहेत.
(ब) शहरातील महत्वाच्या ठिकाणी पोलीस व्हिजीट बुक ठेवून गस्तीदरम्यान त्यावर पोलीसांकडून नोंद करण्यात येते.
(क) रात्रगस्तीच्या वेळी अचानक नाकाबंदी व कोंबिंग ऑपरेशन करुन संशयीत वाहने, व्यक्तींची तपासणी करण्यात येते.
(ड) पोलीस घटकांकडून शहरातील मोठ्या व महत्वाच्या आस्थापना, दुकाने, हॉटेल, इत्यादी ठिकाणी सी.सी.टी.व्ही कॅमेरे लावावे याबाबत त्यांचे प्रबोधन करण्यात येत आहे.
(इ) ग्रामीण भागात ग्रामसंरक्षण दले कार्यान्वित करुन त्यांना मार्गदर्शन केले जात आहे.
(ई) स्थानिक गुन्हेगार व हिस्ट्रीशीटर यांच्याविरुध्द सी.आर.पी.सी.११० प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ कलम ५६ प्रमाणे तडीपार करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) विलंब झालेला नाही

---

**राज्यात 'शक्ती' विधेयकास तत्कालीन राष्ट्रपती महोदयांची मंजूरी न मिळल्याबाबत**

**(३२) ४५१११ (३१-१०-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महिला व बालकांवरील लैंगिक शोषणाच्या गुन्ह्यांना आळा बसण्याकरिता गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी तयार केलेले महत्त्वाचे 'शक्ती' विधेयक तत्कालीन राष्ट्रपती महोदयांच्या मंजुरीशिवाय केंद्रीय गृह मंत्रालयाने दिनांक ७ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे परत पाठविण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू 'शक्ती' विधेयकास मंजूरी न मिळण्याबाबत तसेच विधेयकाबाबतचे आक्षेप दूर करुन राष्ट्रपती महोदयांकडे मंजूरीसाठी पाठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०२-२०२३) :** (१) व (२) महिला व बालकांवरील लैंगिक शोषणाच्या गुन्ह्यांना आळा बसविण्याकरिता महाराष्ट्र शासनाने पारित केलेले शक्ती विधेयक मा. राज्यपाल यांच्या मंजूरीनंतर मा. राष्ट्रपती महोदयांच्या मान्यतेकरिता पाठविण्यात आले होते. सदर विधेयकाबाबत मा. राज्यपाल सचिवालय यांच्या दि. ३१.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये केंद्रीय गृह मंत्रालय, विधी व न्याय मंत्रालय व इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय यांच्याकडून सूचना/ हरकती/आक्षेप प्राप्त झाले आहेत. सदर सूचना/हरकती/आक्षेपांबाबतचे स्पष्टीकरण गृह मंत्रालय, भारत सरकार यांना सादर करण्यात आले असून गृह मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील कॉलेजमध्ये विद्यार्थीनीची केलेली फसवणूक**

**(३३) ४५१७७ (३१-१०-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील कॉलेजमध्ये शासकीय कोट्यातून प्रवेश मिळवून देतो असे सांगून मध्य प्रदेशामधील एका विद्यार्थीनीची सुमारे १६ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात सेंट जॉर्ज रुग्णालयातील डॉक्टरांमार्फत प्रवेश देतो असे सांगून फसवणूक करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार आरोपीला अटक करण्यास पोलिसांना यश आले आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०१-२०२३) :**(१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

तथापि, पुणे येथील सिंहगड कॉलेजमध्ये प्रवेश मिळवून देतो, असे आश्वासन देऊन सोलापूर येथे राहणा-या फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन रुपये १६,३५,०००/-इतकी रक्कम फिर्यादी यांचेकडून घेऊन फिर्यादीचे मुलीचे ॲडमीशन न करता आर्थिक फसवणूक केली याप्रकरणी विश्रामबाग पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.र.नं. २५८/२०१९ कलम ४२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हाचा तपास चालू आहे..

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वैभववाडी तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) अरुणा मध्यम प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातून सांगुळवाडी या गावाला वंचित ठेवल्याबाबत**

**(३४) ४५२०८ (०९-१०-२०२२). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैभववाडी तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) अरुणा मध्यम प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातून सांगुळवाडी या गावाला वंचित ठेवण्यात आले असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावाला १००० हेक्टर क्षेत्र ग्रॅव्हिटीने पाणी पुरवठा होणार नसल्याने वगळण्यात आले आहे, तसेच याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प यांना निवेदने दिलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सांगुळवाडी गावाचे १००० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०१-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे. प्रकल्प अहवालानुसार सांगुळवाडी हे गाव लाभ क्षेत्रात येत असुन शासन निर्णय क्र.सिंचन २०१५/ प्र. क्र.२४/२०१५/ जसं( धोरण) दिनांक १३/०१/२०१७ अन्वये सिंचन प्रकल्पात नलीकेद्वारे पाण्याचे वितरण करणे करिता प्रत्यक्ष बंदिस्त नलिका सर्वेक्षण केल्यानंतर सांगुळवाडी या गावाचा काही भाग हा प्रवाही सिंचन पध्दतीने लाभ देण्यासाठी लाभक्षेत्रात येत नसल्याचे दिनांक २५/०६/२०२१ रोजी निदर्शनास आले आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे. शासन निर्णय क्र.सिंचन २०१५/ प्र. क्र.२४/२०१५/ जसं(धोरण) दि. १३/०१/२०१७ अन्वये सिंचन प्रकल्पात नलीकेद्वारे पाण्याचे वितरण करणे करिता प्रत्यक्ष बंदिस्त नलिका सर्वेक्षणानुसार,

| अ.क्र. | डावा कालवा, लाभक्षेत्रात येणारी गावे | अधिसुचना २०१३ नुसार येणारे क्षेत्र हेक्टर |
|---|---|---|
| १ | येडगाव | २४२.५६ |
| २ | सांगुळवाडी | ४९८.९६ |
| ३ | वायंबोशी | २२६.४८ |
| | एकूण | ९६८.०० |

उपरोक्त गावांचे ९६८ हे. क्षेत्र लाभक्षेत्रात येत नसल्याने प्रवाही सिंचन पध्दतीने लाभ देता येत नाही. मा. सरपंच, ग्रामपंचायत सांगुळवाडी यांनी दि. ०९/०७/२०२२ रोजी कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभागीय पथक, आंबडपाल, ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग यांना निवेदन दिलेले आहे.
(३) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. परंतु सांगुळवाडी व इतर गावांचे ९६८ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणण्याचे दृष्टीने कार्यकारी संचालक यांनी दि. १९/०२/२०२२ रोजी क्षेत्रीय पाहणी केली व अरुणा नदीवर आवश्यक ठिकाणी कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे प्रस्तावित करण्याच्या सूचना दिल्या, त्यानुसार क्षेत्रीय स्तरावर अभ्यास करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नगर व श्रीगोंदा तालुक्यांसाठी वरदान ठरणाऱ्या साकळाई उपसा सिंचन योजनेचे संरक्षण व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रलंबित असल्याबाबत**

**(३५) ४५३७८ (०९-१०-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगर व श्रीगोंदा तालुक्यांसाठी वरदान ठरणाऱ्या साकळाई उपसा सिंचन योजनेसाठी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडून शासनास माहे फेब्रुवारी,२०२२ रोजी प्रस्ताव सादर करुन देखील उक्त तालुक्यांमधील ७० -७५ गावातील पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावर २३ वर्षांपासून तोडगा निघालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू स्थानिक लोकप्रतिनिधींनी उक्त योजनेबाबत पाठपुरावा करुन प्रलंबित योजनेचे सर्वेक्षण तातडीने पूर्ण करणे तसेच, कुकडी खोऱ्यामधील अतिरिक्त तीन टीएमसी पाणी सदर योजनेसाठी वापरण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत अनेक बैठका घेऊन सदरचे सर्वेक्षण न करताच पश्चिमेकडे वाहून जाणारे पाणी साकळाई उपसा जलसिंचन योजनेत कसे वळविता येईल, इतक्या महत्त्वाच्या कामासाठी तुटपूंजा १३ लाखांचा निधी उपलब्ध करुन दिला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या या मागणीच्या अनुषंगाने (बगल) पश्चिमेकडे वाहून जाणाऱ्या पाण्याचे सर्वेक्षण करण्याकरिता शासनाने कोणती उचित कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१२-२०२२) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
प्रथमत: कुकडी प्रकल्पाचे फेर जलनियोजन करुन त्यात साकळाई उपसा सिंचन योजनेचा समावेश करावा व पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यांनतर सदर योजनेचा कुकडी प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवालात समावेश करण्यासाठी सविस्तर सर्वेक्षणास दि.०८/१२/२०२२ च्या पत्रान्वये महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांना मान्यता कळविली आहे.
(२) होय.
(३) हे खरे नाही.
(४) कुकडी खोऱ्यालगत कोकणामध्ये पश्चिमकडे वाहून जाणारे पाणी पूर्वेकडील कुकडी व इंद्रायणी खोऱ्यात वळविणेच्या तसेच भिमा, इंद्रायणी, मुळा, मुठा व निरा खोऱ्यात वळविणेची सर्वेक्षण व अन्वेषणाची कामे प्रगतीपथावर आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात आदिवासी व इतर पारंपारिक घटकांना वन पट्ट्यांचे वाटप करण्याचे वन हक्क समितीकडे दावे प्रलंबित असल्याबाबत

**(३६) ४५३८७ (२२-०९-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वर्षानुवर्षे वन जमीन कसत असलेल्या अनुसूचित जमाती व पारंपारिक वन निवासींना वैयक्तिक व सामुहिक वन हक्क तसेच, दोन्ही प्रकारचे धारणाधिकार शासनाने दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या अधिकारानुसार आदिवासी लोकांना उपजीविकेसाठी शेती करणे, वन जमीन धारणा येथे वास्तव्य करणे, वनोत्पादन गोळा करणे, वन संपत्तीची विल्हेवाट व सुरक्षा करणे इत्यादी प्रकारचे हक्क वन निवासी अधिनियम, २००६ अन्वये मिळालेले असून वन जमीन धारणा हक्क पात्र लोकांना अजुनही जमिन मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुसूचित जमाती व पारंपारिक वन निवासींना ४ हेक्टरपर्यंत जमीन देण्याची कायद्यात तरतूद केली असल्याने उक्त तरतूदीच्या अनुषंगाने पात्रता धारकांनी वन हक्क समितीकडे माहे मार्च, २०२२ पर्यंत २२५४९ दावे दाखल झाले असून त्यावर सुनावणी होऊन १७,२७० दावे निकाली काढण्यात असूनही ५२७९ दावे अद्याप प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वन हक्क समितीने प्रलंबित प्रकरणांची तातडीने सुनावणी करुन आदिवासी लोकांना त्यांच्या हक्काची जमीन मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१६-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

राज्यात माहे ऑक्टोंबर, २०२२ अखेर १,९६,६८४ इतके वैयक्तिक वनहक्क दावे व अपिल मान्य करण्यात आले असून १,५५,३९३ वनहक्क धारकांना ७/१२ वाटप करण्यात आलेला आहे. उर्वरीत ७/१२ वाटपाची कार्यवाही सुरू आहे. तसेच राज्यात ८, ५०७ सामुहिक वनहक्क दावे व अपिल मान्य करण्यात येऊन सामुहिक वनहक्काबाबतची प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत.

(३) राज्यातील माहे मार्च, २०२२ पर्यतची स्थिती पुढीलप्रमाणे होती.

वैयक्तिक वनहक्क दावे व अपिले-

प्राप्त दावे +अपिल मान्य दावे + अपिल प्रलंबित दावे+अपिल

२,८३,२७९ १,९४,०२६ ८,३२७

सामुहिक वनहक्क दावे व अपिले-

प्राप्त दावे मान्य दावे प्रलंबित दावे+अपिल

९,२०७ ८,३३२ ३९२

(४) वनहक्क कायद्याची अंमलबजावणी व सनियंत्रण यासाठी मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सनियंत्रण समितीच्या बैठकांमध्ये संबंधित जिल्हाधिकारी यांना वनहक्काची प्रकरणे निकाली काढण्याचे निदेश दिले जातात. विभागस्तरावरूनही पत्रान्वये वेळोवेळी जिल्हाधिकारी यांना वनहक्काची प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचना दिल्या जातात.

(५) प्रश्न उद्भवत नाही

**हिंगोली येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहातील दोन विद्यार्थ्यांना मारहाण केल्याबाबत**

**(३७) ४५४१२ (३१-१०-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहातील दोन विद्यार्थ्यांनी जेवणाची तक्रार केल्याच्या कारणावरुन त्यांना मारहाण केल्याचे दिनांक १ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी हिंगोली शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मारहाणी प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन हिंगोली शहर येथे गु.र.नं १८५/२०२२, भा.दं.वि. कलम ३२३, १४३, ५०४, १०९, २९४, ३४ व अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा, १९८९ कलम ३(१)(आर), ३(१)(एस), ३(२)(५-व्ही) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्ह्यातील एकूण ५ आरोपींपैकी ३ आरोपींना मा. न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. आरोपी क्र.४ अल्पवयीन असल्याने त्यास नोटीस देऊन सोडण्यात आले आहे. तसेच आरोपी क्र.५ यास दिनांक १८.०५.२०२२ रोजी अटक करण्यात आली होती तदनंतर मा. न्यायालयाने आरोपीस जामीन मंजूर केला आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील कार्यालयातंर्गत येणा-या हिंगोली व परभणी या दोन जिल्हयातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित असल्याबाबत**

**(३८) ४५४१५ (२३-०९-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील कार्यालयातंर्गत येणा-या हिंगोली व परभणी या दोन जिल्हयातील ११८६ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित असल्याचे माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर प्रलंबित अर्ज निकाली काढण्याकरिता वारंवार मुदतवाढ देऊनही अर्ज प्रलंबित रहात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शिष्यवृत्तीचे अर्ज सत्वर निकाली काढण्याबाबत तसेच दिरंगाई करणाऱ्या दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२१-१२-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात एकूण ३९६३ विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज भरलेले आहेत. त्यापैकी महाविद्यालयाकडून एकूण ३५४६ विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूरीसाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळमनुरी यांना सादर करण्यात आले आहे. प्राप्त झालेल्या अर्जांपैकी ३५३५ अर्ज प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळमनुरी यांच्याकडून मंजूर करण्यात आले असून उर्वरीत ११ विद्यार्थ्यांच्या अर्जावर त्रुटीपुर्तता करुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. परभणी व हिंगोली या दोन्ही जिल्हयातील महाविद्यालयांना उर्वरित विद्यार्थ्यांचे अर्ज निकाली काढण्याबाबत सूचीत केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मूर्तिजापूर (जि.अकोला) तालुक्यातील सौर ऊर्जा प्रकल्पाला लागलेली भीषण आग**

**(३९) ४५४३० (१४-१०-२०२२). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मूर्तिजापूर (जि.अकोला) तालुक्यातील सौर ऊर्जा प्रकल्पाला भीषण आग लागण्याची घटना दिनांक १७ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सौर ऊर्जा प्रकल्पाला लागलेल्या आगीची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, भविष्यात अशी घटना होऊ नये यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) व (२) होय. मेसर्स सनब्लेस सोलार प्रा.लि. या कंपनीच्या मौजे रंभापूर, ता.मुर्तिजापूर, जि. अकोला येथील ३० मेगावॅट क्षमतेच्या सौर पार्क मधील मेसर्स. निऑन लॅबोरेटीज लि. यांच्या १.५ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाच्या, कंट्रोल रूम जवळील रोहित्राच्या, केबलच्या टर्मिनल जॉईंट किट मध्ये दिनांक १४ एप्रिल,२०२२ रोजी बिघाड उत्पन्न झाल्यामुळे, टर्मिनलवर शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचे आढळून आले.

(३) सदर कंपनीकडून स्टोअर यार्ड वेगळया ठिकाणी आस्थापित करण्यात आले असून प्रकल्पस्थळी अग्निरोधक संयंत्रे आस्थापित करण्यात आली आहेत, तसेच स्वीच यार्ड व इलेक्ट्रिकल संयंत्राजवळील गवत नियमितपणे कापण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक पोलीस प्रशासनाच्या मनमानी कारभाराबाबत**

**(४०) ४५४४८ (०७-१०-२०२२). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरात विना हेल्मेट पेट्रोल दिल्यास पेट्रोल पंप चालकांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा नोंदवण्याचे आदेश नाशिक पोलीस प्रशासनाने काढल्याचे दिनांक ३० मार्च, २०२२ रोजी व त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस प्रशासनाच्या मनमानी कारभाराच्या विरोधात पंप चालकांनी पाडव्याच्या दिवशी पेट्रोल पंप बंद ठेवण्याचा निर्णय घेतला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अशाप्रकारचे आदेश पोलीस प्रशासनाने कोणत्या नियमानुसार काढले तसेच शासनाने या आदेशास मंजुरी दिली आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाची मंजुरी नसल्यास अशा प्रकारचे बेकायदेशीर आदेश काढणाऱ्या पोलिस प्रशासनातील अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर प्रस्तावास विरोध दर्शविण्यासाठी नाशिक शहरातील पेट्रोलपंप चालकांनी दि.०२.०४.२०२२ रोजी पेट्रोलपंप बंद ठेवले होते.

(३) व (४) सदर प्रस्तावास पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांची अद्यापपर्यंत मान्यता मिळालेली नाही. यास्तव या संकल्पनेची अंमलबजावणी पोलीस आयुक्तालय, नाशिक कार्यक्षेत्रात करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक येथील भू-माफियांकडून शासनाचे नियम धाब्यावर बसवून गुंठेवारीने जमिनीची विक्री होत असल्याबाबत

**(४१) ४५४५२ (२८-१०-२०२२). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विल्होळी (जि.नाशिक) येथील भू-माफियांकडून शासनाची कोणतीही परवानगी न घेता ग्रामपंचायतीचा ठराव करुन बेकायदेशीररित्या गुंठेवारीने जमिनीची विक्री केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी, नाशिक यांना सादर केल्यानंतर संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात सामान्य नागरिकांची लाखो रुपयांची फसवणूक होत असताना व जिल्हाधिकारी यांच्याकडून गुन्हेगारांवर कारवाई करण्याचे आदेश दिलेले असताना स्थानिक पोलिस प्रशासनाकडून कारवाई करण्यास जाणीवपूर्वक विलंब केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त भू-माफिया यांच्या प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१२-२०२२) :**(१) तत्कालीन सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांनी विल्होळी ता. नाशिक शिवारातील शेतगट नं.१५०/२,१५०/३/११४५ चे बनावट अभिन्यास तयार केले तसेच, तत्कालीन तलाठी व मंडळ अधिकारी यांनी सदर अभिन्यास न तपासल्यामुळे भुखंडाचे विनापरवानगी उपविभाजन होऊन नियमबाह्य हस्तांतर झाले आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) व (४)

सदर प्रकरणात नाशिक तालुका पोलीस स्टेशन येथे आरोपीविरुध्द गु.र.नं.१५/२०२२ भादवि कलम ४२०,४६८,४७१,३४ प्रमाणे दिनांक १२.०१.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात एकुण ५ आरोपी निष्पन्न झाले असून, मा. उच्च न्यायालयाने आरोपींना अटकपुर्व जामीन मंजुर केला आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

## भायखळा (मुंबई) येथील पोलीस वसाहतीत असणाऱ्या इमारतीच्या अडथळ्यासंदर्भात वारंवार येणाऱ्या तक्रारीबाबत

**(४२) ४५४९१ (२५-१०-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भायखळा (मुंबई) येथील पोलीस वसाहतीला १०० वर्षाहून अधिक वर्षे झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस वसाहतीत असणाऱ्या इमारतीची होणाऱ्या नादुरुस्ती संदर्भात वारंवार तक्रारी केल्या जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दुरुस्तीच्या कामात होणाऱ्या दिरंगाईमुळे तेथील रहिवाश्यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०२३) :** (१),(२) व (३) सदर इमारती १०० वर्षाहून जुनी असल्याने, इमरतीच्या दुरूस्तीच्या अनुषंगाने तसेच रहिवाश्यांकडून प्राप्त होणाऱ्या सूचनेनुसार वेळोवेळी दुरूस्तीच्या कामांची अंदाजपत्रके/प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पोलीस आयुक्त, मुंबई या कार्यालयास सादर केली जातात. त्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर इमारतीच्या दुरूस्तीची कार्यवाही केली जाते. त्यासाठी पोलीस आयुक्त, मुंबई यांच्याकडून निधी पुरविण्यात येतो. २०२२-२३ मध्ये पोलीस वसाहत व जमादार बंगला भायखळायासाठी रु.१९.२२ लाख वतिरित केले असून गेल्या पाच वर्षात रु.२.८२ कोटी वितरित केले आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवा मोंढा (जि.परभणी) येथील नवीन पोलीस ठाण्याच्या निर्मितीच्या प्रस्तावाबाबत**

**(४३) ४५५५२ (२५-१०-२०२२). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवा मोंढा (जि.परभणी) येथील पोलीस ठाण्यावर शहरातील निम्म्या लोकसंख्येचा भार असल्यामुळे व पोलीस ठाण्याची वाढलेली हद्द लक्षात घेऊन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ भागात नवीन पोलीस ठाण्याच्या निर्मितीचा प्रस्ताव स्थानिक पोलीस प्रशासनाने शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे काय, मंजूरी दिली असल्यास त्याची सद्य:स्थिती काय आहे, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०२३) :** (१) व २) होय.
पोलीस अधीक्षक, परभणी यांचे आस्थापनेवरील पोलीस ठाणे, नवामोंढा,परभणी ग्रामीण ताडकळसचे विभाजन करून नवीन एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे निर्माण करणेबाबत पोलीस अधीक्षक,परभणी यांनी पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना प्रस्ताव सादर केला होता. तथापि, सदरहू प्रस्तावातील काही त्रुटींच्या पूर्ततेसह सुधारित प्रस्ताव सादर करणेबाबत पोलीस अधीक्षक,परभणी यांना पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दि.२/३/२०२२ रोजीच्या पत्राव्दारे कळविण्यात आले आहे.
म्हणून, उपरोक्त प्रस्ताव अद्याप शासन स्तरावर प्राप्त नाही.प्राप्त झाल्यानंतर नियमानूसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी येथे अनेक पोलीस ठाण्याला स्वत:ची इमारत नसल्याबाबत**

**(४४) ४५५५४ (२५-१०-२०२२). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी येथे अनेक पोलीस ठाण्याला स्वतःची इमारत नसल्याने सद्यःस्थितीत पत्राच्या शेडमधून पोलीस ठाण्याचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पाळणाघर व महिला पोलिसांसाठी विश्रांती कक्ष ही पत्र्याच्या शेडमध्येच असून पोलिस ठाण्यातील कर्मचा-यांची राहण्याची व्यवस्थाही नसल्याने त्यांना इतर शहरातून ये-जा करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पोलीस अधिकारी व कर्मचा-यांची अनेक पदे रिक्त असल्याने मागील काही वर्षापासून जुगार, देशी दारु, मटका आदी अवैध गैरकारभारांचे प्रमाण वाढले आहे , हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणाबाबत पोलीस ठाण्यांसाठी सुसज्ज इमारत, पोलीस कर्मचा-यांसाठी वसाहत व आवश्यक तो कर्मचारी वर्ग नियुक्त करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०२३) :** (१) व ( २) अंशत: खरे आहे.
परभणी जिल्हयातील पोलीस ठाणे, कोतवाली व चारठाण्याला पोलीस विभागाची स्वत:ची इमारत नाही. पोलीस ठाणे कोतवालीचे कामकाज सध्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भाड्याचे इमारतीमध्ये असून पोलीस ठाणे चारठाण्या कामकाज ग्रामपंचायत चारठाणा येथील हुतात्मा स्मारकाच्या इमारतीमधून सुरु आहे. पोलीस ठाणे चारठाणा येथे टिन शेडमध्ये महिला विश्रांती कक्ष उपलब्ध आहे. पोलीस ठाणे चारठाणा येथील पोलीस अंमलदार यांचेसाठी चारठाणा येथे पोलीस वसाहत नाही,

(३) परभणी पोलीस घटकामध्ये पोलीस अधिकारी व कर्मचारी एकूण मंजूर १९३८ पदांपैकी १६३ पदे रिक्त आहेत. जिल्हयात जुगार व दारुबंदी संबधीत सन २०२१ मध्ये एकूण १९०५, तर सन २०२२ मध्ये २०६६ केसेस दाखल झाल्या आहे.

(४) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, यांचेकडून पोलीस अधीक्षक, परभणी यांचेकरिता सेलू व चारठाणा येथे पोलीस स्टेशन इमारतीचे बांधकामासाठी कार्यवाही सुरु आहे. महाराष्ट्रातील २०२०-२१ मधील पोलीस शिपाई पदाची भरती प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील १३२ केव्ही चे तीन नवीन केंद्र उभारण्याबाबतचा प्रस्ताव मंडळ कार्यालयातून वरिष्ठ कार्यालयाकडे प्रलंबित असल्याबाबत

**(४५) ४५५६२ (२३-०९-२०२२). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील १३२ केव्ही चे तीन नवीन केंद्र उभारण्याबाबतचा प्रस्ताव मंडळ कार्यालयातून वरिष्ठ कार्यालयाकडे गेल्या २ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावामध्ये पालम तालुक्यातील पेठशिवणी, परभणी तालुक्यातील पोखर्णी आणि पूर्णा तालुक्याचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर केंद्राना मान्यता न मिळाल्यामुळे तसेच सद्यःस्थितीत अस्तित्वात असलेल्या केंद्रावर ताण पडत असल्याने ग्रामीण भागात उपकेंद्राना वीज पुरवठा करतांना अनेक समस्या निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नवीन १३२ केव्ही केंद्र उभारणीचा प्रस्ताव प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत व सदर प्रस्तावांना तात्काळ मान्यता देण्याच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.

सद्यस्थितीत,पालम तालुक्यातील पेठ शिवणी, परभणी तालुक्यातील पोखर्णी आणि पूर्णा या तिन्ही तालुक्यांमध्ये महावितरण मार्फत नविन १३२ के.व्ही. उपकेंद्रांची मागणी करण्यात आलेली नाही.

(३) व (४) परभणी जिल्हयातील महापारेषणच्या २२० के.व्ही. परभणी व १३२ के.व्ही गंगाखेड व पूर्णा ही उपकेंद्रे अखंडित वीज सेवा पुरवठा करण्यासाठी सक्षम आहेत.

भविष्यात परभणी जिल्ह्यात विजेची मागणी वाढल्यास व महावितरण कंपनीकडून नवीन उपकेंद्राबाबतचा प्रस्ताव महापारेषण कपंनीस प्राप्त झाल्यास प्रणाली अभ्यासाद्वारे सुसाध्यता तपासून नियानुसार योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## माडखोल नदीतील (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) गेल्या अनेक वर्षापासून साचलेला गाळ उपसा करण्याबाबत

**(४६) ४५६३१ (२८-०६-२०२२). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माडखोल (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) नदीपात्रात गेल्या अनेक वर्षापासून मोठया प्रमाणात गाळ साचला असून

पावसाळ्यात अतिवृष्टीत पुराचे पाणी धवकडी बाजारपेठेसह घरांमध्ये शिरुन गतवर्षी २३ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास कोटयवधी रुपयांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर माडखोल नदीतील साचलेला गाळ उपसा करण्याबाबत महसूल प्रशासनाकडे ग्रामस्थांनी वारंवार विनंती केली असता त्याकडे संबंधित अधिका-यांचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नदीतील गाळ सत्वर न उपसल्यास तहसिल कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा माजी संरपंचानी जिल्हाधिकारी,सिंधुदुर्ग यांना दिनांक ०१ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे पुरस्थिती निर्माण होऊन ग्रामस्थांचे होणारे नुकसान टाळण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) :** (१) होय, खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे, माडखोल ग्रामस्थांनी दि. १७.११.२०२१ व दि.०८.०४.२०२२ रोजी माडखोल नदीतील गाळ काढण्याबाबत महसुल प्रशासनाकडे विनंती केली होती.
याबाबत जलसंपदा विभागाच्या स्थापत्य विभागाकडील क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी पहाणी करून गाळ काढणेबाबत अहवाल यांत्रिकी विभाग, अलोरे यांना सादर केला आहे.
(३) होय, खरे आहे. श्री. संजय भिकाली लाड, माजी सरपंच, माडखोल यांनी दि.०८.०४.२०२२ रोजी माडखोल नदीतील गाळ उपसा करणेबाबत कार्यकारी अभियंता सिंधुदुर्ग पाटबंधारे विभाग, आंबडपाल ता. कुडाळ यांना निवेदन दिले असून त्याची प्रत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केली आहे.
(४) कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, आलोरे यांनी मौजे माडखोल, जि. सिंधुदुर्ग येथील नदीतील गाळ (एकुण १६६ स.घ.मी.) काढण्याच्या कामास दि. ०६.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये तांत्रिक मंजुरी दिली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दि.२६.०५.२०२२ या पत्रान्वये सदर कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर प्रशासकीय मान्यता झालेनंतर पावसाळी हंगामात पूर परिस्थती निर्माण हावू नये यासाठी यांत्रिकी विभाग, अलोरे यांचेकडून गाळ काढणेबाबत दि. ०१.०६.२०२२ पासून कार्यवाही सुरू करण्यात आली. दि.३०.०६.२०२२ अखेर २८२० घ.मी. गाळ काढण्याचे काम झाले आहे. दि.३०.०६.२०२२ नंतर पाऊस सुरु झाल्यामुळे काम बंद ठेवण्यात आले आहे. पावसाळ्यानंतर उर्वरीत काम हाती घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यतील पंढरपूर येथे संतपीठ उभारण्याबाबत

**(४७) ४५६५७ (२५-०९-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूरच्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या कायद्यात संतपीठाची उभारणी करण्याविषयीचा उल्लेख असतानाही गेल्या ३७ वर्षांत संतपीठ केवळ कागदावरच राहिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भक्ती मार्गावरील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या जागेवर संतपीठ उभारण्याचा विचार सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी तातडीने निर्णय घेऊन संतपीठ उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.
मंदिर समितीच्या दि.०७.०९.२०१७ रोजीच्या सभेतील ठराव क्र.१८(१६) अन्वये " संत तुकाराम महाराज संतपीठ " या नावाची परिसंस्था स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

मंदिर समितीमार्फत संतपीठासाठी व प्रशासकीय इमारतीसाठी जागा उपलब्ध करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(२) व (३) संत तुकाराम महाराज संतपीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची पंढरपूर शहर, जि.सोलापूर येथे २०६३९ चौ.मी. इतकी जमीन आहे. सदर जमिनीवर भक्तीनिवास असून ते १८३६ चौ.मी इतके आहे. सदर जागा श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरला कायमस्वरूपी रेडीरेकनरच्या दराने किंवा दिर्घमुदतीच्या कराराने (९९वर्षे) नाममात्र दरात उपलब्ध करून देण्याबाबत समितीने विनंती केली आहे. त्याबाबतचा पाठपुरावा समितीमार्फत करण्यात येत आहे. प्रस्तावित संतपीठासाठी ४० हेक्टर जागेची आवश्यकता असून शासनाच्या मालकीची मौजे वाखरी, ता.पंढरपूर येथे ३८.२२ हेक्टर जमीन उपलब्ध असल्याचे निर्दशनास आले आहे. सदरची जागा प्रस्तावित संतपीठासाठी योग्य असल्याने सदर जागा किंवा इतरत्र ठिकाणची शासकीय/ निमशासकीय /खाजगी जागा पंढरपूर विकासप्राधिकरणामार्फत मंदिर समितीसाठी आरक्षित करण्याबाबत समितीकडून विनंती करण्यात आली आहे. “ संत तुकाराम महाराज संतपीठाची ” स्थापना करण्याच्या दृष्टीने सदरचा विषय तिर्थक्षेत्र विकास आराखड्यामध्ये समाविष्ट करणेबाबत प्रस्ताव समितीमार्फत दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चोपडा मतदार संघातील (जि.जळगांव) जलसंपदा विभागांतर्गत प्रलंबित कामांबाबत

**(४८) ४५६७२ (०९-१०-२०२२). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चोपडा मतदार संघातील (जि.जळगांव) जलसंपदा विभागांतर्गत प्रलंबित असलेल्या १) निम्न तापी प्रकल्प, पाडळसे या प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करणे, २) ल.पा.योजना हरिपूरा, व लघुपाटबंधारे योजना, निम्बादेवी, ता.यावल प्रकल्पांचे काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करणे, ३) हतनूर सिंचन प्रकल्पावरील उजवा कालवा किमी ५० ते ९२ मधील विशेष दुरुस्तीच्या कामाची अंदाजपत्रके मंजूर करणे, ४) शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळणेसाठी गुळ मध्यम सिंचन प्रकल्पाची उंची वाढविणे व गुळ मध्यम सिंचन प्रकल्पात बांधित झालेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीच्या भूसंपादनासाठी तसेच सदर प्रकल्पाच्या बंदिस्त पाईप लाईनकरिता आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार मा.जलसंपदा मंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाव्दारे व प्रत्यक्ष भेटून मागणी केलेली आहे तसेच दिनांक १७/०५/२०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांकडे ही लेखी निवेदनाव्दारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यत काय निर्णयात्मक कार्यवाही केली आहे,
(३) अद्याप मागणीच्या अनुषंगाने निर्णय घेण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) अशंत: खरे आहे.
चोपडा विधानसभा मतदार संघातील जलसंपदा विभागाच्या प्रलंबित समस्या सोडविण्यासाठी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दि. ३०.०७.२०२२ रोजी लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे.
(२) १. निम्न तापी प्रकल्प, पाडळसे, ता. अमळनेर - या प्रकल्पाचा समावेश केंद्र शासन पुरस्कृत PMKSY-AIBP (२०२१-२६) या योजनेअंतर्गत करण्याच्या अनुषंगाने शासनाच्या दि. ०७.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक माहिती केंद्रीय जल आयोगाच्या नागपूर कार्यालयास सादर करण्यात आलेली आहे. तसेच, सदर प्रकल्पास चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव महामंडळाने तयार करण्यात आला असून सद्य:स्थितीत दि. २६.०८.२०२२ रोजीच्या महामंडळाच्या पत्रान्वये SLTAC, नाशिक यांना सादर केला आहे.
सदर प्रकल्पास चतुर्थ सुप्रमा प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकल्पाचा समावेश प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.
२. लघु पाटबंधारे योजना हरिपूरा व निम्बादेवी, ता. यावल, जि. जळगांव
सदर प्रकल्पांसाठी अवशिष्ट प्रकल्पांतर्गत अनुक्रमे ५.०० कोटी व २.०० कोटी इतक्या रक्कमेची तरतुद सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरीता करण्यात आलेली आहे.

३. हतनूर उजवा कालवा किमी ५० ते ९२ मधील दुरूस्तीच्या कामाबाबत -

सन २०२२-२३ मधील मंजूर निधी व निर्माण झालेले दायित्व यांनुसार चालू आर्थिक वर्षात तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव कडील विशेष दुरूस्ती / विस्तार व सुधारण कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे शक्य नाही.

४. गुळ मध्यम प्रकल्प -

प्रकल्पाची उंची वाढीची कार्यवाही यापूर्वीच झालेली असून प्रकल्पाच्या पूर्ण संचय पातळीत २६७.१५ वरून २६८.४८ मीटर ने वाढ करून १९.६९ दलघमी ऐवजी २३.२५ दलघमी पाणीसाठी निर्माण करण्यात आला आहे. त्यामुळे सिंचन क्षमता २६३७ हे. वरून ३०२५ हे. इतकी झाली आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत पर्जन्यमानाच्या अभ्यासानूसार उंची वाढ करणे शक्य नाही. तसेच, प्रकल्पाच्या भुसंपदाना करीता रक्कम रू. २४.४० कोटी इतका निधी उपलब्धतेनूसार वितरीत करण्यात येणार आहे.

तसेच, बंदिस्त पाईपलाईनच्या कामाकरीता संकल्पनाची कार्यवाही प्रगतीत असून बंदिस्त पाईपलाईनच्या कामाचा समावेश प्रकल्पाच्या पाचव्या सुप्रमा अहवालात देखील केलेला असून सद्य:स्थितीत सदर अहवालाची कार्यवाही क्षेत्रीय विभागीय स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

निम्न तापी प्रकल्पाच्या चतुर्थ सुप्रमा प्रस्तावास शासनाची मान्यता मिळाल्यानंतर सदर प्रकल्पाचा समावेश प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत करण्याकरीता सुधारित प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात येणार आहे. तसेच, गुळ प्रकल्पाबाबत मा. लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने कार्यवाही पुर्ण करण्यात आली असून हरीपुरा व निंबादेवा प्रकल्पांसाठी निधीची तरतुद करण्यात आलेली आहे.

---

## चोपडा शहरात पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता निवासस्थाने बांधण्याबाबत

**(४९) ४५६८१ (२५-१०-२०२२). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा शहरात पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता निवासस्थाने बांधण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक १७ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास पोलीस गृहनिर्माण मंडळामार्फत शासनाकडे सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास शासनाने अद्यापही मंजूरी दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावास मंजूरी देऊन चोपडा तालुक्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता निवासस्थाने बांधण्याबाबत शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०२३) :**(१),(२) व (३) पोलीस निवासस्थाने बांधण्यासंदर्भात झालेल्या बैठकीमध्ये ज्या पोलीस स्टेशनच्या ठिकाणी शक्य आहे अशा ठिकाणी पोलीस स्टेशनास सेवा निवासस्थाने ही पोलीस स्टेशनच्या आवारात बांधण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असुन, सदर प्रस्तावामध्ये ज्या पोलीस स्टेशनची सेवा निवासस्थानाची मागणी ५० ते १०० दरम्यान आहे, अशा ५९ पोलीस स्टेशनच्या यादीमध्ये पोलीस अधीक्षक, जळगाव येथील पोलीस स्टेशन, चोपडा शहर व ग्रामीण करिता प्रशासकीय इमारत व ६९ निवासस्थानाचा समावेश आहे. त्यावर निधीच्या उपलब्धतेनूसार व प्राधान्यक्रमानूसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यावल तालुक्यातील (जि.जळगांव) प्रस्तावित यावल उपसा सिंचन योजनेस (उभ्दव शेळगांव बॅरेज) तत्वतः मान्यता देण्याबाबत**

**(५०) ४५६८२ (१२-१०-२०२२). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील यावल तालुक्यातील प्रस्तावीत यावल उपसा सिंचन योजनेस (उभ्दव शेळगांव बॅरेज) रु ५९२.०१ कोटी किंमतीच्या अद्ययावत दरसुचीचा प्रस्ताव कार्यकारी संचालक, तापी विकास महामंडळ यांनी जलसंपदा विभागामार्फत मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ३ मार्च,२०२२ रोजी मान्यतेसाठी सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावास दिनांक ०९/०५/२०२२ रोजी तात्काळ मान्यता देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२२) :** (१) होय, जळगांव जिल्ह्यातील यावल तालुक्यातील प्रस्तावीत यावल उपसा सिंचन योजनेस (उभ्दव शेळगांव बॅरेज) मा. मुख्यमंत्री स्तरावरून तत्वत: मान्यता मिळणेबाबतचा अद्ययावत दरसूचीनुसार रु. ५९२.०१ कोटी किंमतीचा कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचा दि. ३ मार्च,२०२२ रोजीचा सुधारित प्रस्ताव शासनास प्राप्त आहे.

(२) अंशत: खरे आहे. मा. विधानसभा सदस्य यांनी दि. ११/०५/२०२२ व दि. १७/०५/२०२२ रोजीच्या निवेदनाद्वारे सदर योजनेस तत्वत: मान्यता मिळणेबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांना विनंती केली होती.

(३) प्रस्तावित यावल उपसा सिंचन योजनेस मा. मुख्यमंत्री महोदयांची तत्वत: मान्यता मिळणेच्या अनुषंगाने कार्यवाही शासनस्तरावर प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.